रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५२
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ शुक्रवार, १० जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

सात दिवस धो धो बरसल्यानंतर पावसाची विश्रांती

अलिबाग : सलग सात दिवस बरसल्यानंतर रायगड जिल्ह्यातील पावसाचा जोर कमी झाला असून गुरुवारी (दि.९) पावसाने दिवसभर विश्रांती घेतली. त्यामुळे विस्कळीत झालेले जनजीवन हळूहळू पूर्वपदावर आले. अतिवृष्टीमुळे महाड, नागोठणे, रोहा येथे पूर आला होता. पावसाचा जोर कमी झाल्याने नद्यांची पाणी पातळी कमी झाली. सावित्री नदीची पातळी कमी झाल्याने महाडमधील पूर ओसरला. कुंडलिका नदीच्या पातळीतही घट झाल्याने रोह्यातील पूरस्थिती निवळली. पाताळगंगा नदीची पातळी कमी झाल्याने खोपोली, खालापूर परिसरातील पूर ओसरला. नागोठणे परिसरातील सखल भागात काही ठिकाणी पूरस्थिती होती. तेथील पूरदेखील ओसरला. दोन दिवसांपासून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुकेळी खिंडीत पाणी साचल्याने बंद होती. हे पाणी ओसरल्याने महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली आहे.

अंतरंग

माथेरानमध्ये पावसाने केला २००० मिमीचा टप्पा पार/२
नागोठणे परिसरातील गावांचा पाणीपुरवठा खंडित/५
फिफा वर्ल्डकपमध्ये युरोपचे वर्चस्व कायम/८

राज्यात समान नागरी कायदा लागू होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; समिती गठीत

मुंबई : प्रतिनिधी

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून महाराष्ट्रात समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.९) विधानसभेत केली.

या समितीने पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल सादर करणे अपेक्षित असून राज्य सरकारचा असा प्रयत्न असेल की आगामी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनातच हा कायदा दोन्ही सभागृहांच्या पटलावर आणला जावा, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

विधानसभेत निवेदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संविधानानुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायदा तयार करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार आपण २०२६च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा केली होती, ती आज प्रत्यक्षात येत आहे. न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये विधी आणि समाजजीवनातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीमध्ये न्यायमूर्ती आर.सी. चव्हाण (माजी न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई), न्यायमूर्ती एस.जी. मेहरे (माजी न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई), डी.के. जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), ॲड. बीरेंद्र सराफ (माजी महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री आणि संविधानाचे अभ्यासक), डॉ. सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या) काम पाहणार आहेत.

या समितीवर कायद्याचा सर्वसमावेशक मसुदा तयार करण्याची जबाबदारी असून साधारणपणे पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत समितीने आपला अहवाल शासनाला सादर करावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. हा मसुदा अहवाल प्राप्त होताच त्यावर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हिवाळी अधिवेशनामध्ये विधेयक मांडण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

समान नागरी कायदा गोवा, उत्तराखंड, आसाम, गुजरात या राज्यांमध्ये लागू करण्यात आला आहे. आता महाराष्ट्रातही हा कायदा लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. हा कायदा लागू झाल्यास धर्म, जात किंवा पंथ विचारात न घेता विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक घेण्याबाबत सर्वांसाठी एकच नियम लागू होतील.

शेतकरी कर्जमाफी लाभ वितरण प्रक्रियेस सुरुवात

विशेष 'पूल बँक खाती' उघडण्याचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने प्रत्यक्ष पावले उचलण्यास सुरुवात केली. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या निधीचे अत्यंत पारदर्शक पद्धतीने वितरण करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये विशेष 'पूल बँक खाती' उघडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे.

या मध्यवर्ती खात्यांमध्ये शासनाचा निधी जमा होताच अवघ्या २४ तासांच्या आत तो पात्र शेतकऱ्यांच्या वैयक्तिक कर्ज खात्यात वर्ग करणे बँकेला बंधनकारक करण्यात आले असून योजनेची अंमलबजावणी पूर्ण होताच ही विशेष खाती तातडीने बंद करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

हे विशेष 'पूल बँक खाते' म्हणजेच अनेक उपखाती किंवा संस्थांचा निधी एकत्र व्यवस्थापित करणारे मध्यवर्ती खाते असून ते सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिकृत नावाने सुरू केले जात आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या मुंबई येथील 'गव्हर्नमेंट बिझनेस ब्रँच'मध्ये हे खाते उघडण्यात येत असून या एकाच मुख्य खात्याच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या निधीचे नियंत्रण, संनियंत्रण आणि थेट वितरण केले जाणार आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यात कोणतीही प्रशासकीय

दिरंगाई किंवा तांत्रिक अडथळे येऊ नयेत यासाठी सरकारने अत्यंत कडक व कालबद्ध नियमावली तयार केली आहे. शासनाकडून या मुख्य पूल बँक खात्यात पैशांची तरतूद जमा झाल्यानंतर बँक प्रशासनाला तो निधी पुढील २४ तासांच्या आत संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात हस्तांतरित करावा लागणार आहे. संपूर्ण प्रक्रियेची व योजनेची अंमलबजावणी 'महाआयटी'च्या अत्याधुनिक ऑनलाइन प्रणालीद्वारे केली जाणार असल्याने संपूर्ण प्रक्रियेत कमालीची पारदर्शकता राहणार असून मानवी हस्तक्षेपाला किंवा भ्रष्टाचाराला कोणताही वाव राहणार नाही.

विशेष पूल बँक खात्याचा वापर केवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती अंतर्गत येणाऱ्या व्यवहारांसाठीच करणे कायद्याने बंधनकारक आहे. अन्य शासकीय, विभागीय किंवा खासगी उद्देशासाठी या खात्यातील निधी वापरण्यास सरकारकडून सक्त मनाई करण्यात आली आहे. या योजनेचा शेवटचा व्यवहार पूर्ण होताच म्हणजेच राज्यातील अंतिम पात्र शेतकऱ्यापर्यंत कर्जमाफीचा लाभ पोहचताच हे तात्पुरते पूल बँक खाते तातडीने बंद करण्याचे आदेश सहकार विभागाने जारी केले आहेत.

राज्यातील सर्व मॉलमधील गेमिंग झोनचे होणार ऑडिट

मुंबई : प्रतिनिधी

मुंबईसह राज्यातील सर्व मॉलमधील गेमिंग झोनमध्ये नागरिकांच्या विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षेचे निकष काटेकोरपणे पाळले जात आहेत का याचा व्यापक आढावा घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील सर्व गेमिंग झोनचे सविस्तर सुरक्षा आणि फायर ऑडिट करण्याचे निर्देश संबंधित महानगरपालिका आयुक्तांना दिले जातील, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि.९) विधान परिषदेत केली.

मुंबईतील मॉल्समधील सुरक्षेचे निकष न पाळणाऱ्या गेमिंग झोनविरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत नियम ९२ अन्वये

आमदार उमा खापरे यांनी सभागृहात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. या चर्चेत आमदार परिणय फुके आणि अमित गोरखे यांनीही सहभाग घेतला.

मुंबईतील मॉलच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना मंत्री सामंत म्हणाले की, मुंबईतील ६८ मॉलची प्रशासनामार्फत प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ४७ मॉलमध्ये आवश्यक ती अग्निसुरक्षा यंत्रणा योग्य स्थितीत आढळून आली, मात्र १८ मॉलमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्याने त्यांना १२० दिवसांची कायदेशीर नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर संबंधित मॉल चालकांनी स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्शन यंत्रणेसह आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपायांची पूर्तता केल्यानंतरच त्यांना पुन्हा परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित तीन मॉल सध्या बंद असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाईचा प्रश्न उद्भवला नाही, असे त्यांनी नमूद केले.

गेमिंग झोनमधील बालकांच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत मंत्री सामंत यांनी फायर ऑडिट अधिक प्रभावी करण्यासाठी नियमांचा आढावा घेतला जाईल, असे सांगितले. या राज्यव्यापी आढाव्याचा सविस्तर अहवाल आगामी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महादेव बेटिंग ॲपचा सूत्रधार पुन्हा अटकेत

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

सहा हजार कोटींच्या महादेव ॲप या ऑनलाइन सट्टा घोटाळ्याचा प्रमुख सूत्रधार सौरभ चंद्रकार याला ओमान पोलिसांनी भारताच्या विनंतीवरून मस्कत येथे अटक केली आहे. याआधी त्याला २०२४मध्ये दुबई पोलिसांनी अटक केली होती, पण कायदेशीर मार्गातून तो सुटला होता.

आता बनावट इंडोनेशियन पासपोर्टद्वारे बेकायदेशीरपणे ओमानमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी रॉयल ओमान पोलिसांनी ही अटकेची कारवाई केली. याआधी २०२४मध्ये सौरभ चंद्रकार याला दुबईमध्ये ताब्यात घेण्यात आले होते, पण कायदेशीर बाबींमुळे तो सुटला होता. त्यानंतर तो बनावट पासपोर्टच्या आधारे ओमानमध्ये पळून गेला. भारताने त्याच्याविरुद्ध इंटरपोल नोटीस जारी केली होती. ओमानसोबत भारताचा प्रत्यार्पण करार असल्यामुळे यावेळी तो ताब्यात येईल, असा तपास यंत्रणांना विश्वास आहे.

निवडक

सोन्या-चांदीच्या दरात घसरण; सराफा बाजारात उलथापालथ

मुंबई : इराण-अमेरिका तणाव, जागतिक आर्थिक अनिश्चितता व आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलांचा परिणाम भारतीय सराफा बाजारावर स्पष्टपणे दिसून आला आहे. देशभरात गुरुवारी (दि.९) सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवण्यात आली. २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम एक लाख ४३ हजार ८९० रुपये, तर चांदीचा दर प्रतिकिलो दोन लाख २३ हजार रुपये खाली आला. आगामी काळात जागतिक घडामोडींनुसार या दरांमध्ये आणखी चढ-उतार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांची भेट

मेलबर्न : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी (दि.९) मेलबर्न येथे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. या दोन्ही पंतप्रधानांनी भारत-ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम आणि इकॉनॉमिक रोडमॅप बिझनेस रिसेप्शन कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी पंतप्रधान मोदींनी भारत आणि ऑस्ट्रेलियाने नैसर्गिक आणि विश्वासार्ह भागीदार म्हणून एकत्र पुढे जाणे केवळ स्वाभाविकच नाही, तर अत्यंत आवश्यकही आहे, असे नमूद केले.

रायगड पोलिसांनी जप्त केलेले ३२६ कोटींचे अमली पदार्थ नष्ट

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील १२ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अमली पदार्थांच्या अवैध तस्करीविरोधात रायगड पोलिसांनी मोठी कारवाई केली होती. एनडीपीएस कायद्यांतर्गत जप्त करण्यात आलेले हे सुमारे ३८० किलो ड्रग्ज नष्ट करण्यात आले. याची किंमत ३२६ कोटी १० लाख सहा हजार ३२४ रुपये आहे.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील १२ पोलीस ठाण्यांमध्ये अमली पदार्थविरोधात कारवाई करण्यात आली होती. याप्रकरणी २७ गुन्हे दाखल झाले होते. त्यात कारवाई करून गांजा, चरस, कोकेन आणि केटामाईन यांसारखे ३८० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. या अमली पदार्थांची किंमत ३२६ कोटी १० लाख सहा हजार ३२४ रुपये आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्व अमली पदार्थांची मुंबई वेस्ट मॅनेजमेंट तळोजा येथे पर्यावरणपूरक आणि कायदेशीर पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, अतिरिक्त कार्यभार पोलीस उपअधीक्षक (गुन्हे) निवृत्ती बोऱ्हाडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी या प्रक्रियेचे नियोजन व अंमलबजावणी केली.

अमली पदार्थ नाश प्रक्रियेदरम्यान जिल्हास्तरीय अमली पदार्थ नाश समिती, शासकीय पंच, न्यायवैद्यक प्रयोगशाळा, कलिना येथील तज्ज्ञ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तसेच वैधमापन शास्त्र विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सर्व कायदेशीर आणि तांत्रिक बाबींची पूर्तता करून ही कारवाई करण्यात आली.

रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक फौजदार प्रसन्ना जोशी, हवालदार अमोल म्हात्रे, कौस्तुभ मगर, रिना पाटील, रेखा म्हात्रे, अस्मिता पाटील, भाग्यश्री पाटील, अभियंती मोकल, सचिन वावेकर, कॉन्स्टेबल स्वामी गावंड, शिपाई अक्षय जगताप, प्रशांत लोहार, सागर थळे यांनी ही कारवाई केली.

मराठवाड्यात भूकंपाचे धक्के

नांदेड : प्रतिनिधी

महाराष्ट्रात एकीकडे पावसाने धुमाकूळ घातलेला असताना दुसरीकडे मराठवाडा भूकंपाच्या धक्क्याने हादरला

आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यांमध्ये रात्री १.३७ वाजल्यापासून ३.२३ वाजेपर्यंत हे धक्के नागरिकांना जाणवले. या भूकंपाची तीव्रता ३.६ ते ४.६ रिश्टर स्केल नोंदवण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार हिंगोली, नांदेड आणि परभणी या तीन जिल्ह्यांत भूकंपाचे चार सौम्य धक्के बसले. जिल्ह्याच्या आपत्कालीन केंद्रावर १.३७ वाजता, २.१५ वाजता, २.१७ आणि ३.२३ वाजता या भूकंपाच्या धक्क्यांबाबत माहिती मिळाली. या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ आणि ४.१ इतकी मोजण्यात आली.

भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात असलेल्या शिरली गावात होता. सुदैवाने यामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेची हानी झाल्याचे वृत्त नाही. जेव्हा हे धक्के जाणवले तेव्हा बहुतेक लोक घरी झोपलेले होते. भूकंपानंतर अनेकांनी घराबाहेर धाव घेतली.

गेल्या सहा वर्षांत हिंगोली जिल्ह्यातील औंधा नागनाथ, कळमनुरी आणि वसमत तालुक्यांमध्ये ३७हून अधिक सौम्य भूकंपांचे धक्के नोंदवले गेले आहेत, मात्र एकाच रात्रीत चार भूकंपांचे धक्के बसण्याची ही पहिलीच घटना आहे.

वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह अखेर सापडला

नवीन पनवेल : वार्ताहर

गेल्या दोन दिवसांपूर्वी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या कळंबोलीतील मयुरेश

पाटील याचा मृतदेह गुरुवारी (दि.९) शिरवली येथील नदीत सापडला.

मयुरेश पाटील व त्याचे मित्र ७ जुलै रोजी पनवेल तालुक्यातील भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात फिरण्यासाठी गेले होते. ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले असता मयुरेशचा पाय घसरला आणि तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. सलग तीन दिवस अग्निशमन दल, एनडीआरएफची टीम, पनवेल तालुका पोलीस ठाणे, ग्रामस्थ व मित्रांनी शोध घेतला. अखेर गुरुवारी मयुरेशचा मृतदेह सापडला. हा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

कोकणातील धरणांमध्ये समाधानकारक जलसाठा

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

दमदार पावसामुळे कोकण विभागातील प्रमुख धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील लहान-मोठ्या जलप्रकल्पांमधील वाढत्या जलसाठ्यामुळे नागरिकांची पाण्याची चिंता मिटण्यास मोठी मदत होणार आहे.

जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार कोकण विभागातील अनेक मोठे आणि मध्यम प्रकल्प ओसंडून वाहत असून सिंचन तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे. ठाणे जिल्ह्यातील बारवी प्रकल्पात सध्या १५१.६४ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. त्यासोबतच तानसा धरणात १००.६१४ दशलक्ष घनमीटर, तर भातसा प्रकल्पात तब्बल ४८०.२६ दशलक्ष घनमीटर इतका पाणीसाठा जमा झाला आहे. मोडकसागर

धरणामध्ये ९३.०३ दशलक्ष घनमीटर पाण्याचा उपयुक्त साठा उपलब्ध आहे.

पालघर जिल्ह्यातील धामणी धरणात १८२.६०७ दशलक्ष घनमीटर आणि कवडास धरणात ८.२ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. रायगड जिल्ह्यातील एकूण ५.१२ टीएमसी साठवण क्षमता असलेला हेटवणे मध्यम प्रकल्प आजपावेतो ७८.९८ टक्के इतका भरला आहे. रायगडातील २८ लघु प्रकल्पांपैकी तब्बल २० प्रकल्प त्यांच्या पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० टक्के भरले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील गडनदी मध्यम प्रकल्पात ६६.३८७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा असून या धरणातून ८४.१५६ क्युमेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अर्जुना मध्यम प्रकल्पात ५२.४७३ दशलक्ष घनमीटर, तर नातूवाडी प्रकल्पात १८.३७७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध असून नातूवाडीतून २१.६७२ क्यसेक्स वेगाने विसर्ग सुरू आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पात तब्बल ४४७.३६९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. याशिवाय अरुणा प्रकल्पात ९२.०२५ दशलक्ष घनमीटर साठा असून तेथून ११.९८ क्युमेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग होत आहे. कोर्ले-सातंडी प्रकल्पात २५.४७४ दशलक्ष घनमीटर साठा व ४४.५३ क्युमेक्स वेगाने विसर्ग सुरू आहे, तर देवघर प्रकल्पात ९८.०२ दशलक्ष घनमीटर इतका उपयुक्त पाणीसाठा जमा झाला आहे. एकूणच संपूर्ण कोकण पट्ट्यातील धरणांतील जलसाठा सुखद आणि समाधानकारक आहे.

विठ्ठलनामाच्या गजरात पालख्या पुण्यात दाखल

पुणे : प्रतिनिधी

विठ्ठलनामाच्या जयघोषात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या गुरुवारी (दि.९) पुणे शहरात दाखल झाल्या. दोन्ही पालख्यांचे उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

यावेळी शहरातील विविध मार्गांवर वारकऱ्यांचे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. फुलांची उधळण, टाळ-मृदंगाचा निनाद आणि अभंगांच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी वासुदेवाची पारंपरिक वेशभूषा परिधान करून वारकऱ्यांचे अनोख्या

पद्धतीने स्वागत केले.

प्रथेप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भवानी पेठेतील विठ्ठल मंदिरात मुक्कामी राहणार आहे, तर संत तुकाराम महाराजांची पालखी नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल. दोन्ही पालख्या ९ आणि १० जुलै रोजी पुण्यात मुक्कामी असणार आहेत. या काळात शहरात विविध धार्मिक कार्यक्रम आणि वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात व्यापक वाहतूक नियोजन करण्यात आले असून महापालिका, पोलीस, आरोग्य, अग्निशमन आणि इतर सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध शासकीय विभागांसह स्वयंसेवी संस्थाही कार्यरत असून पुणे शहर विठ्ठलमय वातावरणाने भारावून गेले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधान मंडळाच्या

डिजिटल डॅशबोर्डचे उद्घाटन

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजात पारदर्शकता, गती आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत विविध प्रलंबित संसदीय आयुधांच्या डिजिटल पाठपुराव्यासाठी विकसित करण्यात आलेल्या अत्याधुनिक डॅशबोर्डचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या डॅशबोर्डमुळे तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चेच्या सूचना, विशेष उल्लेख, औचित्याचे मुद्दे आदी संसदीय आयुधांच्या प्रलंबिततेची रिअल-टाईम माहिती उपलब्ध होणार असून शासन आणि विधानमंडळ यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

विधानभवन येथे झालेल्या या कार्यक्रमास विधान परिषद सभापती, प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषद उप सभापती सचिन अहिर, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान मंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, शिवदर्शन साठ्ये उपस्थित होते.

यावेळी विधानमंडळ सचिव जितेंद्र भोळे यांनी डॅशबोर्ड विषयी माहिती दिली आणि संगणकीकरण आणि डिजिटल परिवर्तनाच्या वाटचालीचा आढावा सादर केला. जुलै २०२२मध्ये दोन्ही सभागृहे पूर्णपणे डिजिटल करण्याचा संकल्प करण्यात आला. त्याअंतर्गत सदस्यांच्या प्रत्येक डेस्कवर अत्याधुनिक मल्टिमीडिया कॉन्फरन्स सिस्टिम बसविण्यात आली. या प्रणालीद्वारे सदस्यांना सभागृहाच्या दैनंदिन कामकाजाची माहिती, विधानमंडळाच्या संकेतस्थळावरील माहिती तसेच इंटरनेटवरील आवश्यक संदर्भ सहज उपलब्ध होत आहेत. भविष्यात ग्रंथालयातील संदर्भ साहित्यही एका क्लिकवर सभागृहात उपलब्ध करून देण्याची सुविधा विकसित करण्यात येत आहे, अशी माहिती जितेंद्र भोळे यांनी दिली.

याच काळात विधानमंडळाच्या महत्त्वाकांक्षी डिजिटलायजेशन प्रकल्पालाही वेग देण्यात आला. सन १९३७पासूनच्या कार्यवाही वृत्तांचे डिजिटायझेशन करण्यात आले असून, २०१३पासूनच्या सभागृहाच्या दृकश्राव्य कार्यवाहीचेही डिजिटल संकलन करण्यात आले आहे. त्यामुळे ऐतिहासिक संसदीय नोंदी संशोधक, सदस्य आणि प्रशासनासाठी अधिक सुलभ होणार आहेत.

राजपत्रे, विधेयके, अर्थसंकल्पीय प्रकाशने, राज्यपालांची अभिभाषणे, विधानमंडळ समित्यांचे अहवाल, चौकशी समित्यांचे अहवाल, शासकीय महामंडळे व विद्यापीठांचे अहवाल, निवडणूकविषयक निर्णय, शासनाच्या योजना व धोरणे, सदस्यांची माहिती तसेच महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय यांच्याही डिजिटल प्रती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

उद्घाटन झालेल्या डिजिटल डॅशबोर्डमुळे संसदीय आयुधांच्या पाठपुराव्याची पारंपरिक कागदी पद्धत संपुष्टात येऊन संपूर्ण प्रक्रिया डिजिटल होणार आहे. या डॅशबोर्डद्वारे आयुधांची सद्यस्थिती, प्रलंबित बाबी आणि विभागनिहाय माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. तसेच "कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे" या समितीच्या कामकाजातही या प्रणालीचा प्रभावी उपयोग होणार आहे.

मुख्य सचिव तसेच विविध मंत्रालयीन विभागांचे सचिव यांनाही त्यांच्या विभागातील प्रलंबित संसदीय आयुधांचा ऑनलाईन पाठपुरावा करता येणार असल्याने उत्तर सादर करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान आणि जबाबदार होईल. शासनाचे विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी हा डॅशबोर्ड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

विधानमंडळाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने उचललेले हे पाऊल राज्यातील संसदीय कामकाज अधिक आधुनिक, पारदर्शक आणि परिणामकारक बनविणारे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

माथेरानमध्ये अतिवृष्टीचा आठवडा

पावसाने २००० मिलिमीटरचा टप्पा केला पार

माथेरान : बातमीदार

माथेरान पर्यटनस्थळी मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला असून २००० मिलिमीटरपेक्षा ही जास्त पर्जन्यनोंद करण्यात आली आहे. मागील वर्षीपेक्षा २३० मि.मी अधिक पाऊस येथे बरसला आहे. इतका जोरदार पाऊस असूनसुद्धा पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनी माथेरान पर्यटनस्थळाला पहिली पसंती दिली आहे.

माथेरानमध्ये या वर्षी मागच्या वर्षीच्या तुलनेत सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडला असून दोन हजार मिलीमीटरचा टप्पा पावसाने पार केला आहे. इतक्या जोरदार पाऊस असून देखील पर्यटक माथेरान मध्ये दाखल झाले होते.यंदाच्या पावसात मोठ्या प्रमाणात वृक्ष उन्मळून पडले असून विद्युत पुरवठ तीन दिवस खंडित झाला होता.वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे माथेरानकरांचा पाणी पुरवठा देखील बंद झाला होता.वीज पुरवठा बंद झाल्याने ई-रिक्षा सेवेला याचा मोठा फटका बसून ई-रिक्षा सेवासुद्धा बंद झाली होती.

दरम्यानच्या काळात मोबाईल नेटवर्क नसल्याने जगाशी संपर्क तुटला होता.ई-रिक्षा सेवा बंद असल्याने पर्यटकांना चालत प्रवास करावा लागला.माथेरान मध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर पाऊस असून देखील मध्य रेल्वेची शटल सेवा अविरत सुरू होती.शटल सेवेला पर्यटकांनी मोठी गर्दी केल्यामुळे अनेकांना तिकीट मिळत नव्हते.

माथेरानमध्ये यंदाच्या पावसाळ्याच्या पहिल्याच आठवड्यात अतिवृष्टीची नोंद झाली असून १ जुलै ते ९ जुलै या अवघ्या नऊ दिवसांत १८९९ मि.मी पावसाची नोंद झाली.दररोज सरासरी २२४ मि.मी पाऊस कोसळल्याने संपूर्ण माथेरान परिसर जलमय झाला असून पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेला शारलोट तलाव अवघ्या चार दिवसांत ओसंडून वाहू लागला आहे.

जून अखेर पर्यंत माथेरानमध्ये केवळ २०७.२ मिमी पावसाची नोंद झाली होती, मात्र ९ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजे पर्यंत पर्जन्यमान एकूण २१०६.२ मि.मी इतके झाले.जुलैच्या पहिल्या आठवड्यातच जूनच्या तुलनेत सुमारे नऊपट अधिक पाऊस झाला आहे.तर गतवर्षी ९ जुलै २०२५ पर्यंत माथेरानमध्ये १८७६.२ मि.मी पावसाची नोंद झाली होती.यंदा त्याच कालावधीत २१०६.२ मि.मी पाऊस झाल्याने मागील वर्षाच्या तुलनेत २३०.२ मिमी अधिक पर्जन्य झाला आहे.

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजनेत वडखळ ग्रामपंचायत तालुक्यात अव्वल

पेण : प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजनेंतर्गत उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर वडखळ ग्रामपंचायतीने पेण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, आता रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत पेण तालुक्याचे प्रतिनिधित्व करत आहे.

जिल्हास्तरीय परीक्षणामध्ये ग्रामपंचायतीच्या विकासकामांना आणि प्रभावी नियोजनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने वडखळ ग्रामपंचायतीला जिल्ह्यातही प्रथम क्रमांक मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजनेअंतर्गत स्वच्छता, पाणीपुरवठा, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, डिजिटल सेवा, लोकसहभाग आणि शाश्वत विकास अशा निकषांवर ग्रामपंचायतींचे मूल्यमापन केले जाते.

या सर्व निकषांमध्ये वडखळ ग्रामपंचायतीने प्रभावी नियोजन, दर्जेदार अंमलबजावणी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाच्या बळावर उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्यात अव्वल स्थान मिळवले आहे.

वडखळ ग्रामपंचायतीची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे JSW फाउंडशनच्या सहकार्याने उभारलेला आधुनिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प. रायगड जिल्ह्यात अशा स्वरूपाचा प्रकल्प राबविणारी वडखळ ही एकमेव ग्रामपंचायत असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकल्पामध्ये ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करून त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण केले जाते. ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती केली जात असून, त्यामुळे स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन साध्य होत आहे. हा उपक्रम जिल्हास्तरीय परीक्षणात विशेष आकर्षणाचा विषय ठरला.

जिल्हास्तरीय परीक्षणादरम्यान विविध विकासकामे, स्वच्छता उपक्रम, घनकचरा व्यवस्थापन, डिजिटल सुविधा तसेच ग्रामपंचायतीच्या नाविन्यपूर्ण योजनांची पाहणी करण्यात आली. परीक्षण पथकाने ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केल्याची माहिती असून, त्यामुळे जिल्ह्यातही प्रथम क्रमांक पटकावण्याच्या आशा अधिक बळावल्या आहेत.

या यशामागे ग्रामपंचायत सरपंच शिवानी म्हात्रे, उपसरपंच योगिता मोकल, ग्रामपंचायत ग्रामअधिकारी श्रीहरी खरात, पदाधिकारी, ग्रामसेवक, कर्मचारी, विविध समित्या, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत. वडखळ ग्रामपंचायतीने जिल्ह्यातही अव्वल स्थान पटकावून पेण तालुक्याचा मान आणखी उंचवावा, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त केली जात आहे.

चार दिवसांपासून चणेरा विभागात विजेचा लपंडाव; युद्धपातळीवर दुरुस्ती सुरू

धाटाव : प्रतिनिधी

चणेरा विभागात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वीज वितरण व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून अनेक गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. सततच्या पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उच्च दाबाच्या वीजवाहिन्या आणि विद्युत खांबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी अनेक गावांमध्ये चार दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य पसरले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत आहेत. मोबाईल चार्जिंग, घरगुती कामे, लघुउद्योग आणि व्यावसायिक व्यवहारही ठप्प झाले आहेत. रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडत असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांचे खांब कोसळून जमिनीवर पडले आहेत. अनेक भागात रस्ते चिखलमय झाल्याने आणि दुर्गम ठिकाणी पोहोचण्यास अडचणी येत असल्यामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. तरीही वीज वितरण विभागाचे कर्मचारी प्रतिकूल परिस्थितीत काम करत असून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

चार दिवस उलटूनही वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित वीज वितरण विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे पूर्ण करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत चणेरा विभागाचे कनिष्ठ अभियंता संदीप म्हात्रे यांनी सांगितले की, गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी उच्च दाब वाहिनीचे विद्युत खांब कोसळले आहेत. त्यामुळे दुरुस्तीच्या कामात अडचणी येत आहेत. नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी मुरुड उपकेंद्रातून पर्यायी (डायव्हर्ट) वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी विद्युत खांब पडले आहेत, तेथे युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू असून लवकरात लवकर नियमित वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी आमचे पथक प्रयत्नशील आहे.

पाचाडमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेबांची ३५३वी पुण्यतिथी

रायगड व पाचाडच्या पाणी प्रश्नासाठी १०४ कोटींची योजना राबविणार -मंत्री भरत गोगावले

महाड : प्रतिनिधी

दुर्गराज रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या राजमाता जिजाऊ यांच्या समाधी परिसरामध्ये मराठी तिथीप्रमाणे राजमाता जिजाऊ यांचा ३५३ वा पुण्यतिथी सोहळा भावपूर्ण ,भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले आवर्जून उपस्थित राहिले होते. त्यांच्या हस्ते राजमाता जिजाऊं मासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आले.

राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त पाचाड येथील सभागृहात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ना.भरतशेठ गोगावले यांनी रायगड किल्ल्यासह रायगड घेरा आणि पाचाड मधील पाणी टंचाई कायमची दूर करण्यासाठी आपण प्रयत्नशील असून त्यासाठी १०४ कोटी रुपयांची पाणी योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

ते पुढे म्हणाले,विधानसभेचे अधिवेशन सुरू असतानाही राजमाता जिजाऊंची पुण्यतिथी चुकवणे आपल्याला शक्य नव्हते. त्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून सुट्टी घेऊन आपण उपस्थित राहिलो. शिवजयंती, राज्याभिषेक, जिजाऊ जयंती आणि पुण्यतिथी हे माझ्यासाठी श्रद्धेचे दिवस आहेत. देवदेवतांच्या यात्रा करा, पण आयुष्यात एकदा तरी रायगड आणि पाचाडला अवश्य या." असे आवाहन त्यांनी केले. पाचाड आणि रायगड परिसराची पाणी समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी १०४ कोटी रुपयांची योजना राबविण्यात येणार आहे. अपूर्ण धरण पूर्ण करून किंवा कोंडरान येथील बोगद्यातून पाणी आणले जाईल आणि त्या योजनेतून पाचाड व रायगड परिसराला कायम स्वरूपी पाणीपुरवठा केला जाईल. भविष्यात या भागात पाण्याची टंचाई जाणवू देणार नाही." अशी ग्वाही त्यांनी दिली.

या अभिवादन कार्यक्रमास पंचायत समिती सभापती सौ. प्रेरणा सावंत, जिल्हा परिषद शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, जि.प. सदस्या मनाली काळीजकर, माजी जि.प. सदस्य मनोज काळीजकर, उपसभापती सुरेश महाडीक, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळ राऊळ, जितेंद्र सावंत, गटविकास अधिकारी साळुंखे, सिंधखेडचे भागवत राजे जाधवराव, पाचाडच्या सरपंच सीमा बेंदुगडे, उपसरपंच अनिकेत जाधव, . पोलीस निरीक्षक , तहसीलदार महेश शितोळे, रघुवीर देशमुख, अनंत देशमुख, रणजित जाधवराव उपस्थित होते.

पळचिल आरोग्य केंद्रास सभापतींची अचानक भेट

पोलादपूर : प्रतिनिधी

पोलादपूर येथील ग्रामीण रुग्णालयालगतच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे पळचिल येथे स्थलांतरित झाल्यानंतर तब्बल १९ वर्षानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या पळचिल प्राथमिक शाळेतून स्वतःच्या इमारतीमध्ये हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाले. गेल्या पाच दिवसांच्या संततधार पावसानंतर गुरुवारी पावसाने उघडीप घेतल्याने पोलादपूर पंचायत समितीचे सभापती अविनाश शिंदे यांनी या प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट दिली. यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांसह डॉक्टर देखील उपस्थित नसल्याचे दिसले. .

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास आणि जलसंधारण विभागामार्फत रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विस्तारीकरण करणे तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तीन निवासस्थाने बांधणे या कामासाठी ३६ लाख ४० हजार ९०५ रूपयांच्या खर्चाला प्रशासकीय मंजूरी दिल्याने प्राथमिक शाळेतील प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत होण्याऐवजी नवीन काम सुरू झाले.

गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या संततधारेने गुरुवारी पहिल्यांदाच उघडीप दिली असल्याने बाह्यरुग्ण गुरुवारपासून येण्यास सुरुवात होण्याची अपेक्षा होती. गुरुवारी सकाळी पोलादपूर पंचायत समितीचे सभापती अविनाश शिंदे यांनी पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट दिल्यानंतर दोन शाळकरी विद्यार्थी बाह्यरुग्ण म्हणून डॉक्टर व आरोग्य कर्मचार्यांची वाट पाहत असल्याचे दिसून आले. यावेळी कोणीही रुग्णसेवा देण्यासाठी उपस्थित नसल्याने सभापती अविनाश शिंदे यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तीन निवासस्थाने बांधण्यात आली असताना त्यांना परगावी राहून ये-जा करण्याचे कारण नसल्याने आरोग्य अधिकारी डॉ.अनिल काकड यांना त्याबाबत विचारणा केली.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीतर्फे शेतकऱ्यांना फळझाडे, औषधी वनस्पतींचे वाटप

माणगाव : प्रतिनिधी

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान' आणि 'शाश्वत कृषी विकास' या धोरणांशी सुसंगत पाऊल उचलत ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे. कंपनीने आपल्या CSRउपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींतील १,२०० हून अधिक शेतकऱ्यांना ४५ प्रजातींची १३,६९३ फळझाडे व औषधी वनस्पती मोफत वितरित केली आहेत.

या उपक्रमामागे पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना उत्पन्नाचे शाश्वतपर्यायीसाधन उपलब्ध करून देणे हा दुहेरी उद्देश आहे. गेल्या चारवर्षांपासूनसातत्याने सुरू असलेल्या या लोककल्याणकारी उपक्रमातून आतापर्यंत ग्रामीण भागात ३५,००० पेक्षा अधिक फळझाडांचे यशस्वी वितरण करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना शोभेची झाडे न देता आर्थिक मूल्य असलेली नगदी फळझाडे देण्यात आली आहेत. यामध्ये आंबा, फणस, पेरू, चिकू, जांभूळ, नारळ यांसारख्या झाडांचा समावेश असून येत्या काही वर्षांत ही झाडे वाढून शेतकऱ्यांसाठी नियमित व भक्कम उत्पन्नाचा स्रोत ठरतील. परिणामी, पारंपरिक शेतीवरचे अवलंबित्व कमी होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होण्यास मदत होईल.या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे फळझाडांसोबतच उपयुक्त व औषधी वनस्पतींचेही वाटप करण्यात आले आहे. यात हळद, तमालपत्र, काळीमिरी, पानवेल, रिठा, हिरडा, शतावरी अशा विविध वनस्पतींचा समावेश आहे. या वनस्पतींच्या माध्यमातून शेतकरी आंतरपीक घेऊन कमी जागेत अधिक नफा मिळवू शकतील. या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात, कंपनीने येत्या ऑगस्ट महिन्यात आणखी २,५०० झाडांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उपक्रमाबाबत बोलताना पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, "हवामान बदलाच्या काळात केवळ वृक्षारोपण पुरेसे नाही; लागवड झालेली झाडे लोकांच्या जिव्हाळ्याचा आणि उपजीविकेचा भाग बनली पाहिजेत.

कोरड्या जूननंतर दमदार जुलै

उरण तालुक्यात ११५३ मिमी पावसाची झाली नोंद

उरण : प्रतिनिधी

उरण तालुक्यात यंदा पावसाने दमदार हजेरी लावली आहे. तालुक्यात दरवर्षी सरासरी दोन हजार ४१ मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद होते, मात्र यावर्षी केवळ आठवडाभराच्या पावसामुळेच आतापर्यंत ११५३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच वर्षभरातील निम्म्याहून अधिक पाऊस अवघ्या आठ दिवसांत झाला आहे.

त्यामुळे पुढील काळात पडणाऱ्या पावसामुळे यावर्षी अधिकच्या पावसाची नोंद होणार असल्याचे चित्र आहे. २०२६च्या पावसाने संपूर्ण जून महिना कोरडा गेला होता. त्यामुळे उरणमधील नागरिक आणि शेतकरी चिंताग्रस्त झाले होते, मात्र जुलै महिन्यात पावसाने दमदार सुरुवात केली. शनिवारपासून आठवडाभर झालेल्या मुसळधार पावसाने आतापर्यंतचा विक्रम केला आहे. या धुवाँधार पावसामुळे उरणला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई व पुनाडे या दोन्ही धरणांच्या पाणी पातळीत

लक्षणीय वाढ झाली आहे.

रानसई धरण भरून वाहू लागले आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनाही शेतीसाठी या पावसाचा लाभ होणार आहे. दुसरीकडे उरण परिसरात होणाऱ्या पावसाच्या प्रमाणात घट होऊ लागली आहे. साधारणपणे दोन हजार ५०० मिलिमीटर पडणारा पाऊस सध्या दोन हजारांवर आला. त्यामुळे उरणच्या पिण्याच्या पाण्याची समस्या वाढू लागली होती, मात्र आता ८ जुलैपर्यंत उरणमध्ये ११५३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे, तर तालुक्याची सरासरी नोंद दोन हजार ४१ मिलिमीटर इतकी असल्याची माहिती उरणचे निवासी नायब तहसीलदार महेश पाटील यांनी दिली आहे.

पनवेलमध्ये गतिमंद मुलीवर अत्याचार

आरोग्यसेवक, डॉक्टर, पोलिसांच्या सतर्कतेमुळे गुन्हा उघडकीस

पनवेल : वार्ताहर

पनवेलमधील २५ वर्षीय गतिमंद आदिवासी मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. संबंधित मुलीच्या कुटुंबीयांनी हा प्रकार लपविण्याचा प्रयत्न केला असला तरी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि पोलिसांच्या सतर्कतेमुळे प्रकरण समोर आले.

पोलिसांनी स्वतः फिर्यादी होत गुन्हा नोंदविला असून अत्याचार करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी न्यायवैद्यक आणि डीएनए तपासणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पीडित मुलीच्या पोटावरून ती गर्भवती असल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आले. त्यानंतर गावात ही बाब समजू नये म्हणून तिला तालुक्यातील नातेवाइकांकडे पाठविण्यात आले. त्या दाम्पत्याला अपत्य नसल्याने जन्माला येणारे बाळ दत्तक घेण्याचा त्यांचा विचार होता. त्यानुसार रुग्णालयात दाखल करताना कागदपत्रांमध्ये दत्तक घेणाऱ्या महिलेचे नाव प्रसुतीसाठी वापरण्यात आले. पीडितेची २६ जून रोजी कामोठे

येथील एमजीएम रुग्णालयात प्रसूती झाली. तिने एका बालिकेला जन्म दिला.

नवजात बालिकेची प्रकृती नाजूक असल्याने तिला रुग्णालयात उपचारासाठी ठेवण्यात आले. या काळात नातेवाइकांकडून मिळालेल्या माहितीत विसंगती आढळल्याने डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना संशय आला. त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी पीडित मुलगी आणि तिच्या वडिलांची चौकशी केली. सुरुवातीला कोणाविरोधात तक्रार नसल्याचे सांगण्यात आले. मात्र रुग्णालयातील मानसशास्त्रज्ञांच्या परीक्षणात पीडित महिलेची बौद्धिक आणि सामाजिक परिपक्वता अत्यंत कमी असल्याचे स्पष्ट झाले. वैद्यकीय अहवालानुसार ती माहितीपूर्ण संमती देण्यास सक्षम नसल्याचे नमूद करण्यात आले. त्यानंतर या महिलेचे लैंगिक शोषण झाल्याचा संशय बळावला.

या अहवालाच्या आधारे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सरदार वसेकर यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या संवेदनशील प्रकरणाचा तपास सुरू आहे. प्रसूतीच्या कालावधीच्या आधारे अत्याचाराची संभाव्य वेळ निश्चित करण्यात आली असून त्या काळात पीडित महिलेच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची चौकशी केली जात आहे. काही नातेवाईकांचे डीएनए नमुने घेण्याची प्रक्रियाही सुरू असून न्यायवैद्यक तज्ज्ञांचे सहकार्य पोलिसांनी घेतले आहे.

वैद्यकीय परीक्षणात संबंधित पीडितेचा बुद्ध्यांक केवळ ११ असल्याचे निष्पन्न झाले. ती केवळ हसून प्रतिसाद देते आणि तिला सांकेतिक भाषाही समजत नाही.

खारघर, कळंबोलीत सिडकोचा हातोडा

अनधिकृत टर्फ आणि रिक्षा शेड तोडले

पनवेल : वार्ताहर

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागाने खारघर आणि कळंबोली नोड परिसरात अनधिकृत बांधकामांविरोधात धडक निष्कासन मोहीम राबविली. या कारवाईत लाखो रुपयांची अनधिकृत बांधकामे जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली.

खारघर सेक्टर ३५जी येथील भूखंड क्रमांक १३ वरील अनधिकृत खेळाचा टर्फ आणि नर्सरी शेडही कारवाईत हटविण्यात आली. त्याचबरोबर कळंबोली नोडमधील मौजे रोडपाली येथील सेक्टर १०ई, भूखंड क्रमांक १ वरील अनधिकृत गॅरेज आणि जुन्या रिक्षांचे पार्किंग शेड देखील

पाडण्यात आले. संबंधित बांधकामे सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तसेच प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून उभारण्यात आली होती. त्यामुळे नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्यात आल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले.

ही मोहीम सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. खारघर व कळंबोली नोडचे नियंत्रक श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी, कर्मचारी, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी संयुक्तरीत्या ही कारवाई पूर्ण केली. अनधिकृत बांधकामांविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे सिडको प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

गर्भपातप्रकरणी गुन्हा दाखल

नवीन पनवेल : महिलेला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि तिला गर्भपात करण्यास भाग पाडून शिवीगाळ आणि खोट्या केसमध्ये अडकवण्याची धमकी दिल्याप्रकरणी ओमकार वैजनाथ रोडगे, इंदू रोडगे, वैभव रोडगे आणि विद्या रोडगे (सर्व राहणार मुंबई) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात ७ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ ते २२ जूनदरम्यान ओमकार रोडगेने पीडित महिलेसोबत प्रेमाचे नाटक करून लग्नाचे आमिष दाखवले आणि शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपीने मोबाइलमधील पीडित महिलेचे न्यूड फोटो समाजमाध्यमांमध्ये प्रसारित करण्याची धमकी दिली आणि तिला जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले. तसेच इंदू रोडगे, वैभव रोडगे, विद्या रोडगे यांनीही पीडित महिलेला शिवीगाळ करून खोट्या केसमध्ये अडकवण्याची धमकी दिली.

भररस्त्यात महिलेच्या दागिन्यांची लूट

पनवेल : वार्ताहर

रस्त्याने पायी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील दोन लाख १० हजार रुपये किमतीची तीन तोळे वजनाची सोन्याची चेन आणि लॉकेट काळ्या रेनकोटमधील तिघा लुटारुंनी खेचून पळ काढल्याची घटना पनवेलमधील नेहमी गजबजलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ घडली.

तक्रारदार महिला पायी चालत असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या तीन अज्ञात लुटारुंनी त्यांच्यावर झडप घातली. त्यांनी महिलेच्या गळ्यातील अंदाजे ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन आणि त्याला असलेली दोन सोन्याची लॉकेट हिसकावून घेतली. त्यानंतर अंधाराचा फायदा घेत तिन्ही लुटारु पळून गेले. घटनेनंतर महिलेने तत्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात लुटारुंविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

घटनेतील तिन्ही लुटारुंचे वय १६ ते १८ वर्षे असल्याचे महिलेने सांगितले. ते अल्पवयीन असण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ओळख पटू नये यासाठी तिघांनीही अंगात सारख्याच पद्धतीचे काळ्या रंगाचे रेनकोट घातले होते.

निवडक

पतीकडून पत्नीला मारहाण

नवीन पनवेल : अन्य महिलेसोबत असलेल्या अनैतिक प्रेमसंबंधामुळे पत्नीला मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी आरोपी पतीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ७ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या सेक्टर १०, कळंबोली येथे राहत असून त्यांच्या पतीचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत. त्यामुळे त्यांचे पती त्यांना वारंवार मारहाण करून शिवीगाळ आणि दमदाटी करतात तसेच त्यांच्या मुलांकडे दुर्लक्ष करून त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास दिला.

'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल

नवीन पनवेल : सात वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी आरोपी बशौकत लष्कर याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ जुलै रोजी अल्पवयीन मुलीची आई कामावर गेली असताना आरोपीने त्यांच्या घरी जाऊन मुलगी घरात असताना त्यांच्या घराचा दरवाजा बंद केला आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२१ लाखांची फसवणूक

नवीन पनवेल : गुंतवणुकीवर पाच टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून २१ लाख पाच हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ७ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माणिक रेड्डी मालीपाटील हे सेक्टर ७, कामोठे येथे राहत असून १५ मे ते २६ जूनदरम्यान अज्ञात इसमाने त्यांना व्हॉट्सॲप ग्रुपला जॉईन केले आणि गुंतवणुकीवर दररोज पाच टक्के नफा देण्याचे आमिष दाखवले. त्यांना एक लिंक पाठवली व त्यावर ट्रेंडिंग खाते उघडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने २१ लाख पाच हजार रुपये रक्कम घेतली आणि ती रक्कम परत न करता त्यांची ऑनलाइन फसवणूक केली. दरम्यान, नागरिकांनी अशा प्रकारच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

कोमल भोईर यांना इन्स्पायरिंग वूमन अवॉर्ड

पनवेल : वार्ताहर

समाजसेवेच्या क्षेत्रात सातत्याने आणि निःस्वार्थ भावने कार्य करणाऱ्या कोमल मोहनिष भोईर यांना 'टॉप ३० इन्स्पायरिंग वुमन अवॉर्ड २०२६' अंतर्गत "Top Achiever Award २०२६ Inspirational Social Activist of the Year" या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. समाजहिताच्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला.

कोमल मोहनिष भोईर या गेली अनेक वर्षे समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. महिलांचे सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य जनजागृती, गरजूंना मदत, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवा या क्षेत्रांत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना आधार मिळाला असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न कायम राहिला आहे.

त्यांचा निःस्वार्थ सेवाभाव, नेतृत्वगुण, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि प्रेरणादायी कार्य यांचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी कोमल मोहनिष भोईर म्हणाल्या,

"हा पुरस्कार माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचा, कुटुंबाचा आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आहे. समाजासाठी केलेले कार्य हीच माझी खरी ओळख असून, यापुढेही अधिक जोमाने आणि प्रामाणिकपणे समाजसेवा करण्यासाठी हा सन्मान मला नवी प्रेरणा देईल." हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा नसून, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही त्यांच्या हातून समाजोपयोगी कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडावे, अशा शुभेच्छा देण्यात येत आहेत. हा पुरस्कार त्यांच्या समाजसेवेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

४९ गुन्ह्यांतील आरोपी गजाआड; १३ घरफोडी उघड

पनवेल : वार्ताहर

नवी मुंबई शहरात घरफोड्या करणाऱ्या सराईत चोरट्याला गुन्हे शाखा कक्ष-१च्या पथकाने कौशल्याने अटक केली आहे. लक्ष्मण शिवशरण (४८) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या अटकेमुळे नवी मुंबई परिसरातील १३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून या गुन्ह्यातील तब्बल २१ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे आणि चांदीचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

अटक करण्यात आलेला आरोपी सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वी तब्बल ४९ गुन्हे दाखल आहेत. तो गेल्या नोव्हेंबर महिन्यातच जामिनावर जेलमधून बाहेर आला होता. बाहेर येताच त्याने पुन्हा चोऱ्यांचा सपाटा लावला होता, अशी माहिती गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांनी दिली. रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा गुन्हे शाखा कक्ष-१ च्या पथकाने समांतर तपास सुरू केला होता. पथकाने घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली. फुटेजमध्ये दिसलेला संशयित सराईत गुन्हेगार लक्ष्मण शिवशरण असल्याचा सुगावा पोलिसांना लागला. पोलिसांनी नवी मुंबई, ठाणे व भिवंडी परिसरात सापळा लावून त्याला भिवंडीतून शिताफीने ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने रबाळे एमआयडीसी, कोपरखैरणे, वाशी व तुर्भे पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १३ घरफोड्यांची कबुली दिली. त्याच्याकडून २१ लाख २५ हजार रुपयांचे सोने २४५.६७ ग्रॅम, चांदी २०८.५ ग्रॅम व इतर वस्तू जप्त केल्यात. आरोपीने रबाळे एमआयडीसीच्या हद्दीत पाच, रबाळे चार, कोपरखैरणे दोन तसेच वाशी व तुर्भे प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण १३ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. ही कामगिरी गुन्हे शाखा कक्ष-१चे विकास घोडके, सहाय्यक पो. निरीक्षक निलेश महाडीक, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप जोरुडे, उदय म्हात्रे, अंमलदार अशोक औरे, चंद्रकांत कदम आणि पथकाने केली आहे.

बामणडोंगरी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यावाटप

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष उलवे नोड १ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ८) रायगड जिल्हा परिषद शाळा बामणडोंगरी येथे वह्यावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पनवेल पंचायत समिती सदस्य वितेश त्रिंबक म्हात्रे, निलेश मधुकर खारकर, धीरज ओवळेकर, सुहास गोंधळी, रामदास नाईक, अंकुश ठाकूर, गीता नंदकुमार ठाकूर, नाना गडकरी, दीपक गोंधळी, रविकांत म्हात्रे, नंदकुमार ठाकूर, रवी भोईर, अभिमन्यू दापोलकर, शैलेश भगत,

सुनील मौर्या, प्रणय कडू, किरण म्हात्रे, रवींद्र शिंदे, विजय ठाकूर, मनोज नाईक, अमित नाईक, शालिख भोईर, मनोज मोर्या, प्रवीण ठाकूर, संतोष पाटील, गणेश पाटील, प्रियांका अडसूळ, प्रणय कोळी, आर. सी. पिल्ले, बेला ठाकूर, निलम ठाकूर, चंद्रकांत दगडू म्हात्रे, पी. सी. म्हात्रे, ज्योती म्हात्रे, कांतीलाल नाईक, विष्णू खोत, महेश पाटील यांच्यासह पालक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात आले.

विविध श्रेत्रांत समाजातील उपेक्षित, वंचित, गरजू व होतकरूंना आर्थिक पाठबळातून स्थैय प्राप्त करून देण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून अविश्रांतपणे उल्लेखनीय काम करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे यावेळी आभार मानण्यात आले.

पनवेल स्टेशनमधील नव्या पुलामुळे प्रवाशांची दमछाक; एस्कलेटर-लिफ्टची मागणी

पनवेल : वार्ताहर

मुंबई महानगर प्रदेशातील वेगाने विकसित होणारे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असलेल्या पनवेल स्थानकात नव्याने उभारण्यात आलेल्या पादचारी पुलांमुळे प्रवाशांना दररोज १२० पेक्षा अधिक पायऱ्या चढ-उतर कराव्या लागत आहेत. त्यामुळे स्थानकात तातडीने आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर अंतर्गत दुमजली कंटेनर मालवाहू गाड्यांच्या वाहतुकीसाठी या पुलांची उंची वाढविण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी बांधण्यात आलेल्या पुलाचाच त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्थानकात सध्या एक पादचारी पूल ६४ पायऱ्यांचा आणि दुसरा ४४ पायऱ्यांचा आहे. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी इतक्या मोठ्या संख्येने पायऱ्या चढणे सर्वसामान्य प्रवाशांसाठी

कष्टदायक ठरत आहे. विशेषतः वयोवृद्ध, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला आणि जड सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची अक्षरशः दमछाक होत आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे सल्लागार सुरेंद्र नेमळेकर यांनी पनवेल स्थानकात तातडीने एस्कलेटर आणि लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, तर सामाजिक कार्यकर्ते संजय गांगनाईक यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी सध्या बंद असलेला भुयारी मार्ग सुरू करण्याची मागणी केली आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

रेल्वे प्रशासनाचे सकारात्मक संकेत

प्रवाशांच्या या मागणीची दखल घेत मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील निला यांनी प्रवाशांच्या अडचणी लक्षात घेऊन संबंधित विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. लाखो प्रवाशांचे लक्ष आता रेल्वे प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. एस्कलेटर, लिफ्ट आणि भुयारी मार्गाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. रेल्वे प्रशासन लवकरच याप्रश्नी तोडगा काढेल, असा प्रवाशांना विश्वास आहे.

संपादकीय

अपप्रचाराला उत्तर

ऊर्जेच्या क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे ही दोन राष्ट्रीय उद्दिष्टे इथेनॉलमिश्रित इंधनसंबंधी धोरणाच्या माध्यमातून एकाच वेळी साध्य होत आहेत. भारताचा हा संपूर्ण इंधन कार्यक्रम वैज्ञानिक अभ्यास, कडक नियामक सुरक्षा आणि जागतिक अनुभवांवर आधारित आहे. त्यामुळेच सरकार आता डिझेलमध्ये १५ टयांपर्यंत आयसोब्युटेनॉल मिश्रित करण्याची योजना आखत आहे.

**भारताचा इथेनॉलमिश्रित इंधनाचा कार्यक्रम हा ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेल्या महत्त्वाच्या पावलांपैकी एक आहे. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण अर्थात 'ई-२०' ही केवळ इंधनविषयक योजना नसून ऊर्जा सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि शेतकरी सक्षमीकरण यांचा संगम आहे. मात्र या उपक्रमाला सुरुवातीपासूनच काही मंडळींकडून विरोध होत असून वाहनांचे नुकसान, इंजिन बिघाड आणि मायलेजमध्ये मोठी घट यांसारखे दावे करून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वास्तविक भारत गरजेच्या ८० टक्के इंधनाची आयात करतो. यासाठी अर्थातच अफाट किंमत मोजावी लागते. जेव्हा जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती वाढतात, त्यावेळी आणखी ताण आपल्याला सोसावा लागतो. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकार आता इथेनॉलमिश्रित इंधनाला प्राधान्य देत आहे. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर सरकार आता डिझेलमध्ये १५ टयांपर्यंत आयसोब्युटेनॉल मिश्रित करण्याची योजना आखत आहे अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच दिली. केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने इथेनॉलमिश्रित इंधनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली असून वाहन उद्योगालाही पुरेसा वेळ दिला आहे. नव्या वाहनांसाठी ई-२० सुरक्षित असल्याचे अनेक तांत्रिक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच वाहनांच्या नुकसानाबाबतचे दावे सोशल मीडियावरील अफवा आणि अपूर्ण माहितीवर आधारित असल्याचे म्हणावे लागेल. देशातील वाहन उत्पादक कंपन्यांनी ई-२० सुसंगत वाहनांच्या निर्मितीसाठी आवश्यक बदल केले आहेत. मायलेजमध्ये काही प्रमाणात फरक पडू शकतो, हे तांत्रिकदृष्ट्या खरे असले तरी त्याचे अतिरंजित चित्र रंगवले जाते आहे. इथेनॉलची ऊर्जा क्षमता पेट्रोलपेक्षा किंचित कमी असल्यामुळे किरकोळ फरक अपेक्षित असतो. परंतु इथेनॉल मिश्रणामुळे होणारी परकीय चलनाची बचत, कच्च्या तेलावरील अवलंबित्वात होणारी घट आणि पर्यावरणीय लाभ विचारात घेता हा बदल राष्ट्रीय हिताचा ठरतो. शिवाय इथेनॉलसंबंधी कार्यक्रमाचा सर्वात मोठा लाभ भारतीय शेतकऱ्यांना होणार आहे. ऊस, मका आणि इतर कृषी उत्पादनांपासून तयार होणाऱ्या इथेनॉलमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार आहे. साखर कारखान्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळणार असून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला पर्यायी बाजारपेठ मिळत आहे. काही विरोधकांकडून इथेनॉलविषयी भीतीचे वातावरण निर्माण करून संबंधित धोरणासंदर्भात प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. परंतु भारतासारख्या मोठ्या ऊर्जा आयातदार देशासाठी पर्यायी इंधनांचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे. जगातील अनेक देश इथेनॉलच्या वापराला प्रोत्साहन देत असताना भारताने मागे राहणे परवडणारे नाही. इथेनॉलविषयी मतभेद असू शकतात. परंतु चर्चा तथ्यांवर आधारित असली पाहिजे. अफवा, अर्धसत्ये आणि दिशाभूल करणाऱ्या आरोपांवर नव्हे. देशाच्या ऊर्जा स्वातंत्र्याच्या प्रवासात इथेनॉल हा महत्त्वाचा टप्पा आहे. या उपक्रमाकडे भीतीच्या नव्हे तर वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रहित, पर्यावरण संरक्षण आणि शेतकरी कल्याण या त्रिसूत्रीचा विचार करता इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाला पाठिंबा देणे हेच दूरदृष्टीचे लक्षण ठरेल.

अलिबागमधील रस्ते बनले पार्किंग झोन

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग शहरातील वाहतूक कोंडी ही आता नित्याची बाब झाली आहे. अलिबागकरांच्या वाढलेल्या वाहनांसोबतच पर्यटक आणि जिल्ह्याच्या ठिकाणी कामासाठी येणाऱ्या लोकांच्या वाहनांमुळे शहरातील रस्त्यांवर नेहमीच वर्दळ असते. मात्र यासोबतच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणारी बेशिस्त पार्किंग ही वाहतूक कोंडीचे महत्त्वाचे कारण बनली आहे. रस्ते रुंद झाले असले तरी त्याचा गैरफायदा घेत दोन्ही बाजूला वाहने उभी केली जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय आणि प्रमुख पर्यटनस्थळ आहे. येथे दररोज हजारो पर्यटक येतात. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, जिल्हा न्यायालय यांसह अनेक महत्त्वाची शासकीय कार्यालये अलिबागमध्ये आहेत. त्यामुळे जिल्ह्याच्या विविध भागातून कामासाठी येणाऱ्या नागरिकांच्या हजारो वाहनांची वर्दळ असते. सकाळ-सायंकाळी वाहतूक कोंडी होते. अलिबाग नगरपरिषदेने महेश टॉकीज, एस.टी. बस स्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय व समुद्राकडे जाणारा ब्राह्मण आळीतील रस्ता यांसारख्या महत्त्वाच्या मार्गांचे रुंदीकरण केले. तरीही वाहतूक कोंडीची समस्या सुटली नाही. समुद्राकडे जाणारा मुख्य रस्ता पूर्वी अरुंद होता. क्रीडाभवन मैदानाचा काही भाग घेऊन त्याचे रुंदीकरण करण्यात आले. यावर मुख्य टपाल कार्यालय, जिल्हा परिषद व जिल्हा सामान्य रुग्णालय आहे. येथे येणारे नागरिक रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी करतात. जिल्हा रुग्णालयाच्या बाहेरही रुग्णवाहिका, दुचाकी आणि चारचाकी वाहने लागलेली असतात. स्टेट बँक ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणारा लोकमान्य टिळक मार्गही तितकाच गजबजलेला आहे. या मार्गावर जिल्हा न्यायालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, अलिबाग पोलीस ठाणे, एक शाळा आणि महाविद्यालय आहे. येथे दररोज हजारो लोक कामानिमित्त येतात. रुंदीकरणानंतरही काँग्रेस भवन ते जे.एस.एम. महाविद्यालय तसेच चुंबकीय वेधशाळा ते जिल्हाधिकारी कार्यालय या परिसरात दोन्ही बाजूला वाहने उभी असल्याने कार्यालयीन वेळेत मोठी वाहतूक कोंडी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते माहावीर चौक हा परिसर वाहतूक कोंडीचे केंद्र बनला आहे. येथे वाहने उभी असतातच, शिवाय फेरीवाल्यांची गाडीही रस्ता अडवतात. एस.टी. आगारातून बसेस बाहेर पडताना येथे मोठी गर्दी होते. पुतळ्याजवळचा रस्ता अरुंद असल्याने तेथेही कोंडी होते. अशोका कॉम्प्लेक्स ते शेतकरी भवन हा मार्ग रुंद असूनही येथे नेहमी वाहने पार्क केलेली असल्याने कोंडी होते. माहावीर चौक ते राम मंदिर आणि बाजारपेठेतील मार्ग आधीच अरुंद आहेत, त्यावरही वाहने उभी केली जातात.अलिबाग-पेण मार्गावरील सेंट मेरी शाळेजवळ शाळा सुटण्याच्या वेळी मोठी वाहतूक कोंडी होते. पालक आपल्या पाल्यांना नेण्यासाठी दोन्ही बाजूला वाहने उभी करतात. अनेकदा या कोंडीत रुग्णवाहिकाही अडकते.

शहरात वाहनांची संख्या वाढली हे कारण आहेच. त्याचबरोबर रस्त्यावरील भटकी जनावरे, फेरीवाले, वाहनचालकांचा बेशिस्तपणा व रस्त्याच्या दोन्ही बाजूला होणाऱ्या बेकायदा पार्किंगमुळे समस्या अधिकच गंभीर झाली. अलिबागमधील रस्ते आता पार्किंग झोन बनलेत. जोपर्यंत शहरात योग्य पार्किंगची व्यवस्था होत नाही, तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही.

वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी स्थानिक प्रशासन व पोलिसांनी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेकायदेशीरपणे उभ्या असणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई आणि फेरीवाल्यांच्या अतिक्रमणांवर नियंत्रण आणल्यास अलिबागमधील वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होऊ शकेल.

बदलते तंत्रज्ञान

ई-वाहनांच्या बॅटरीचा स्फोट का होतो?

गेल्या काही वर्षांत ई-स्कूटर आणि ई-बाईकच्या बॅटरीला आग लागणे किंवा स्फोट होण्याच्या काही घटना समोर आल्या आहेत. यामुळे ई-वाहन खरेदी करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मात्र तज्ज्ञांच्या मते, योग्य काळजी घेतली तर ई-वाहन पूर्णपणे सुरक्षित आहेत.बॅटरी तज्ज्ञ डॉ. केतन शहा यांच्या मते, बहुतेक ई-वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या लिथियम-आयन बॅटरीला "थर्मल रनअवे" ही प्रक्रिया होऊ शकते. याचा अर्थ बॅटरीच्या आत प्रचंड उष्णता तयार होऊन ती अनियंत्रित होते आणि परिणामी आग किंवा स्फोट होतो.स्फोटाची प्रमुख कारणे अनेक आहेत.

त्यात प्रामुख्याने खराब दर्जाचे सेल, चुकीची BMS म्हणजेच बॅटरी मॅनेजमेंट सिस्टीम, चार्जिंग करताना अति तापमान आणि बॅटरीला झालेले फिजिकल डॅमेज यांचा समावेश होतो. मानांकन नसलेला स्वस्त चार्जर वापरल्यास ओव्हरचार्जिंग होऊन बॅटरी गरम होते. तसेच ४५ डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात चार्जिंग करणे धोकादायक आहे. पावसात भिजलेली किंवा ओली बॅटरी लगेच चार्ज केल्यास शॉर्टसर्किट होण्याची शक्यता असते. अपघातामुळे किंवा खड्ड्यात जोरात आदळल्याने बॅटरीला अंतर्गत तडे गेल्यासही धोका वाढतो.मात्र या सर्व धोक्यांवर मात करून ई-वाहन सुरक्षितपणे वापरता येऊ शकते. त्यासाठी काही मूलभूत नियम पाळणे आवश्यक आहे. सर्वात आधी खरेदी करताना BIS मानांकन असलेली आणि सरकारने लागू केलेल्या AIS-१५६ या नवीन सुरक्षा मानकांचे पालन करणारी वाहने निवडावीत. चार्जिंगसाठी नेहमी कंपनीने दिलेलाच मूळ चार्जर वापरावा. अनधिकृत आणि स्वस्त चार्जरमुळे बॅटरीवर ताण येतो.चार्जिंग करताना विशेष काळजी घ्यावी. पार्किंगमध्ये चार्जिंगसाठी स्वतंत्र, हवेशीर आणि सावलीची जागा असावी. बॅटरीच्या आजूबाजूला ज्वलनशील वस्तू ठेवू नयेत. बॅटरी १००% चार्ज झाल्यानंतर लगेच प्लग काढावा आणि रात्रीभर चार्जिंगवर ठेवणे टाळावे. पावसात बॅटरी पूर्णपणे कोरडी झाल्यावरच ती चार्ज करावी. बॅटरी फुगल्यास, विचित्र वास येत असल्यास किंवा नेहमीपेक्षा लवकर डिस्चार्ज होत असल्यास वापर थांबवून अधिकृत सर्व्हिस सेंटरशी संपर्क साधावा. दर्जेदार बॅटरी, योग्य चार्जर व योग्य वापराच्या सवयीमुळे ई-वाहन इंधन बचतीसोबतच सुरक्षित प्रवासाचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

इतिहासकार डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

निमित्त

गोव्यातील एक प्रसिद्ध इतिहासकार डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख... पांडुरंग पिसुर्लेकर यांचा जन्म ३० मे १८९४ रोजी गोव्यातील शेणवी कुटुंबात पिसुर्ले (ता. सत्तरी) येथे झाला.

आईचे नाव कृष्णाबाई. त्यांचे शिक्षण साखळी व पणजी येथे झाले. शिक्षकीपेशाचे प्रशिक्षण व वकिलीचे शिक्षण घेऊन सुरुवातीस त्यांनी बिचोली येथे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले. बोरकर कुटुंबातील रमाबाई यांच्याशी १९१३ साली त्यांचा विवाह झाला. लीलावती ही त्यांची मुलगी. रमाबाई १९६३मध्ये मरण पावल्या.

पिसुर्लेकरांचे सर्व शिक्षण पोर्तुगीज भाषेमधून झाले होते; तथापि त्यांना इंग्रजी, फ्रेंच, कोकणी, संस्कृत या भाषा तसेच मोडी लिपी चांगल्या प्रकारे अवगत होती. त्यांचे लेखन मुख्यत्वे मराठी व पोर्तुगीज या दोन भाषांतच आढळते. शिक्षकीपेशानंतर त्यांनी पणजीच्या अभिलेखागारात काम पतकरले (१९३१). या अभिलेखागाराच्या संचालकपदावरून ते १९६१मध्ये निवृत्त झाले. पिसुर्लेकरांनी या अभिलेखागाराखालील दप्तरखाना सुधारला; त्यातील कागदपत्रे खंडवार लावली आणि त्यासंबंधी सूची व दोन मार्गदर्शिका प्रसिद्ध केल्या. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाने पणजी येथे इतिहास संशोधन केंद्र स्थापन केले. त्याचे संचालकपद पिसुर्लेकरांकडे होते.

पिसुर्लेकरांनी स्फुटलेख व शोधनिबंध यांव्यतिरिक्त अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे लेखन मुख्यत: पोर्तुगीज भाषेत असून त्याचे मराठी व इंग्रजी भाषांत भाषांतर झाले आहे. त्यांचे पुढील ग्रंथ महत्त्वाचे आहेत : अ आन्तीग् ईन्दिय् ई ऊ मून्दु इश्तेर्नुं (१९२२), आश्पॅक्तुश् दा सिव्हिलिझासांव् दा ईन्दिय् आन्तीग् (१९२४), पुर्तुगेझिश् ई मारातश् (१९२६-३९), रेजिमॅन्तुश् दश् फोर्तालेझस् दा ईन्दिय् (१९५१), आजॅन्तिश् दा दिप्लोमासीय पुर्तुगेझ ना ईन्दिय् (१९५२), आस्सेन्तुश् दु कोंसेल्यु दु इश्तादु दा ईन्दिय् (१९५३-५७). यांखेरीज त्यांनी अनेक पोर्तुगीज कागदपत्रे प्रसिद्ध केली. अ आन्तिगिदादि दु क्रिश्नाईज्मु या पुस्तकात कृष्णसंप्रदाय हा इसवी सनापूर्वीपासून अस्तित्वात होता, हे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांचा पोर्तुगेज-मराठे संबंध अर्थात पोर्तुगेजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास (१९६७) हे पुस्तक महत्त्वाचे असून मराठ्यांच्या इतिहासावर त्याने नवीन प्रकाश टाकला आहे.

पिसुर्लेकरांना लेखनसंशोधनाबद्दल अनेक मानसन्मान मिळाले. पोर्तुगाल शासनाने त्यांना नाइट ऑफ द मिलिटरी ऑर्डर ऑफ सँटिएगो हा किताब दिला (१९३५). याशिवाय रॉयल एशिटिक सोसायटी (बंगाल) आणि एशिटिक सोसायटी (मुंबई) यांनी त्यांना सुवर्णपदके दिली (१९४८ व १९५३).

लिस्बन विद्यापीठाने डी. लिट्. ही सन्मान्य पदवी त्यांना देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. कर्करोगाने ते पणजी येथे १० जुलै १९६९ रोजी निधन पावले.

(साभार इंटरनेट)

चित्र रंगवा



आरोग्य प्रहर

पावसाळ्यात साचलेल्या घाण पाण्यात जपून चाला

पावसाळ्यात सर्दी-खोकला आणि ताप यांसारखे संसर्गजन्य आजार होत असतात. या काळात रस्त्यावर साचलेलं पाणी आणि अस्वच्छतेमुळे लेप्टोस्पायरोसिस या संसर्गजन्य आजाराचा धोकादेखील वाढतो.

पावसाळा सुरु झाला की, अनेक साथीचे रोग आपले डोके वर काढतात. रस्त्यावर साचलेल्या पाण्यात पाय जरा जपूनच टाकायला हवे. अनेकदा चिखलामुळे किंवा घाणीमुळे पाय खराब झाल्यामुळे आपण सहज त्या डबक्यात पाय घालतो, परंतु याचा गंभीर परिणाम आपल्याला सहन करावा लागू शकतो. इतकेच नाही तर लहान मुले या डबक्यात उड्या मारतात, पण यामुळे लेप्टो नावाचा संसर्गजन्य आजार होण्याची अधिक शक्यता असते.

उंदीर आणि घुशींच्या मलमूत्रातून लेप्टो नावाचा संसर्गजन्य आजार हा साचलेल्या पाण्यातून माणसांपर्यंत पोहचतो. त्यामुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यात पाय न बुडवणे आणि वैयक्तिक स्वच्छता न राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला. आपल्या पायाला कोणतीही जखम झाली असेल आणि त्यावर उंदराचे मलमूत्र मिसळलेल्या पाण्याच्या संपर्कात आपण आल्याने लेप्टो नावाचा आजार होऊ शकतो. या साथीच्या आजाराचा सामना करण्यासाठी उपाययोजनाही आहेत.

आजारांची लक्षणे काय?

सतत ताप येणे, डोकेदुखी, थंडी वाजणे, स्नायुदुखी, उलटी आणि कावीळ सारखी लक्षणे या आजारात पाहायला मिळतात. तसेच रुग्णांना श्वास घेण्यास अडचणी येतात. मूत्रपिंड आणि यकृत निकामी होते. यावर योग्यवेळी उपचार मिळाल्यास त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याचा धोका टाळता येतो.

अशी घ्या काळजी

१. पावसाळ्यात पाणी तुंबलेल्या ठिकाणाहून चालू नये. पाण्यात चालताना गुडघ्यापर्यंत गमबूट घालावेत. तसेच दूषित पाण्याच्या संपर्कात येऊ नका.

२. पायावर कोणतीही जखम असेल तर त्यावर वेळीच योग्य तो उपचार करावा. दूषित पाण्यामुळे जखम आणखी वाढून संसर्गजन्य आजार वाढू शकतात.

३. घाणीच्या पाण्यातून घरी आल्यानंतर अंघोळ करावी. तापासारखी लक्षणे दिसल्यावर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कचरा वेळेत साफ करावा. घराजवळ पाणी साचणार किंवा तुंबणार नाही याची काळजी घ्यावी. पावसाळ्यात होणारे संसर्गजन्य आजार, ताप किंवा जखमांकडे दुर्लक्ष करू नका.

केटी बंधाऱ्यावरील पाइपलाइन फुटून नागोठणे परिसरातील गावांचा पाणीपुरवठा खंडित

नागोठणे : बातमीदार

मुसळधार पावसामुळे पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील के.टी. बंधारा परिसरात मोठे नुकसान झाले असून येथे असलेल्या पाइपलाइन फुटल्या तसेच काही वीजखांब कोसळले आहेत. या घटनेमुळे नागोठणे व परिसरातील सुमारे ४० गावांचा पाणीपुरवठा रविवार पासून बंद झाला असून नागरिकांना गेले पाच दिवस पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

के.टी. बंधाऱ्यावरील पंपहाऊसमधून डोलवी ता. पेण येथील जेएसडब्ल्यू कंपनीकडे दोन पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा केला जातो. यापैकी एक पाइपलाईन जेएसडब्ल्यू कंपनीसाठी तर दुसरी नागोठणे व परिसरातील गावांसाठी आहे. पाइपलाइन फुटल्याने दोन्ही पुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला आहे.

जेएसडब्ल्यू कंपनीने दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेतले असून असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट बळवंत जोग यांच्या मार्गदर्शनाखाली शंभरहून अधिक कामगार व अधिकारी कार्यरत आहेत. पुढील दोन दिवस पाइपलाइन वेल्डिंगचे काम सुरू राहणार असून रविवारी (दि. १२) सकाळपासून पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी माहिती बळवंत जोग यांनी दिली आहे.

दरम्यान, सुमारे ३० वर्षे जुन्या असलेल्या के.टी. बंधाऱ्याचे संरचनात्मक लेखापरीक्षण करून आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरण करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. २२० केव्हीचा वीजवाहक मनोरा सुरक्षित राहिल्याने मोठा अनर्थ टळला. भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

जीवावर उदार होऊन श्वानाची केली सुखरूप सुटका

पाली : येथील अंबा नदी पुलाखाली पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या एका मुक्या कुत्र्याला प्राणीमित्र अमित निंबाळकर यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता धाडसाने पाण्यात उतरून सुरक्षित बाहेर काढले.

या बचाव मोहिमेदरम्यान पाली येथील महावितरण कर्मचारी भावेश पाटील, रुपेश ठोंबरे तसेच पत्रकार संदेश उतेकर यांनीही महत्त्वाची साथ देत पाठीराख्याची भूमिका बजावली. त्यांच्या सहकार्यामुळे हे बचावकार्य अधिक सुरक्षित आणि यशस्वीपणे पूर्ण होऊ शकले. उपस्थित नागरिकांनी सर्वांचे कौतुक केले.

Karmaveer bhaurao Patil Vidyalay pirkon bhag Shala khopte
Tal. Uran, Dist. Raigad

Notice Inviting E-Tender

Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Bhaurao Patil Vidyalay, Khopte, Tal. Uran, Dist. Raigad invites tenders for Civil Work for Classroom from reputed contractors. Sale of tenders from 10/07/26 at 11.00 am till 14/07/26upto 01.00 pm at Karmaveer Bhaurao Patil Vidyalay, Khopte, Tal. Uran, Dist. Raigad. Submission of tender till 15/07/26 upto 03.00 pm.

Name of work	Estimated Cost	Blank Tender Costa	EMD (in form of D.D)
Civil Works for Classroom	Rs. 491593/-	Rs. 1000/- (non refundable)	Rs. 10,000/-

sd/-
Head Mistress, Karmaveer Bhaurao Patil Vidyalay,
Khopte, Tal. Uran, Dist. Raigad

रामवाडी एसटी स्थानकात अडकलेल्या प्रवाशांना शिवसेना शिंदे गटाकडून मदत

पेण : प्रतिनिधी

५ व ६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणाकडे जाणारे प्रवासी मध्येच अडकून पडले होते. यावेळी रामवाडी एस.टी, स्थानकात अडकून पडलेल्या प्रवाशांना शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या पदाधिकारी कल्पना प्रशांत पाटील व त्यांच्या मातोश्री महिला बचत गटाच्या सदस्यांनी दिलासा देण्याचे काम केले.

मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते अशातच संपूर्ण गोवा महामार्ग पाण्याखाली गेल्यामुळे एसटी

बसेसना पुढे जाण्यास काहीच मार्ग नव्हता. त्यामुळे रामवाडी स्थानकामध्ये प्रशासनाने एसटी बसेस थांबवून ठेवलेल्या होत्या. त्यातील दोनशे प्रवासी व वाहन चालक तिथे अडकून राहिले होते ही बाब शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीप्रमुख कल्पना पाटील यांच्या लक्षात आली.

शिवसेना पक्षप्रमुख एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार व आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एसटी स्टँड मधील प्रवाशांना मातोश्री महिला बचत गटाच्या माध्यमातून सकाळी चहा नाश्त्याची व पाण्याची मोफत सोय करून दिली तसेच संध्याकाळी ही परिस्थिती सुधारली नसल्याने सर्व प्रवाशांना व चालक वाहक यांना संध्याकाळी जेवणाची मोफत सोय करून दिली.

यावेळी सर्व प्रवासीजेवण करून रात्री एक वाजता एसटी बसेस मार्गाला लागल्यावर सुख रूपपणे आपल्या घरी पोहोचले.

जावळी हायस्कूलमध्ये मोफत शालेय वस्तू वाटप, गुणगौरव सोहळा

माणगाव : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ जावळी यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्याचे खा.सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय वस्तूंचे मोफत वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्याहस्ते शनिवार दि. ११ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता महाराष्ट्र भूषण तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल जावळी येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षातील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते,महिला कार्यकर्त्या,पालकवर्ग यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ जावळी यांच्यावतीने करण्यात आली आहे.

खासदार सुनील तटकरे यांचे राजकीय व सामाजिक,शैक्षणिक,क्रीडा आदी क्षेत्रांत मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श नजरेसमोर ठेऊन त्यांचा दि.१० जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ जावळी यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जुलै रोजी बहुजन समाजातील गोरगरीब जनतेच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम ११ जुलै रोजी जावळी शाळेत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे यांनी दिली.

खोपोलीमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

खोपोली : प्रतिनिधी

समाजाने आपल्याला भरभरून दिले,आता समाजाचे काहीतरी देणे फेडण्याची वेळ आपली आहे," या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या खालापूर तालुक्यातील होनाड ग्रामपंचायत हद्दीतील टेंबेवाडी येथील आनंदी सोप वर्क्स प्रा.लि. कंपनीने महाराष्ट्र भूषण,थोर समाजसुधारक तीर्थरूप डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा हृदयस्पर्शी उपक्रम राबविला.

सन २०१० मध्ये कंपनीची स्थापना झाल्यापासून दरवर्षी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याची परंपरा कंपनीने जपली आहे.

जाहीर नोटीस

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड

क्र. मृत्यू/रजि/एसआर /२०२६

श्रीम. अलका अंकुश वाघे,
रा. कांढरोली तर्फे वनखळवाडी, खालापुर. जि. रायगड } **वादी**

विरुध्द

२) निबंधक, जन्म – मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कलोते , ता. खालापूर, जि. रायगड } **प्रतिवादी**

जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. अलका अंकुश वाघे, रा. कांढरोली तर्फे वनखळवाडी, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांची आई कै. मैना एकनाथ वाघे यांचा मुत्यु दिनांक ०५/०३/१९९२ रोजी मौजे विनेगाव कातळाचीवाडी, पो. वावंढळ ता. खालापूर, जि. रायगड येथे झाला आहे. सदर मुत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्यांचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण :– खालापूर
दिनांकः– ०९/०७/२०२६

शिक्का

सही/–
(अभय चव्हाण)
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

श्री. विकास पवार, महसूल नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी खालापूर यांचे न्यायालयात,

क्र.मशा/फौजदारी/कलम–५/वहिवाट/दावा क्र– २०२५

प्रति,
१. श्री. कैलास रमाकांत पंडीत
२. श्री. कृष्णा नारायण वाघरे,
रा. खालापूर, ता. खालापूर } **अर्जदार**

विरुद्ध .

१. श्री. मोतीलाल पारसमल बोहरा,
रा. खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड
२. श्री. विनोद जगदीशप्रसाद जाखोटीया,
रा. मैथिली निवास, पाटणकर वाडा खोपोली,
३. श्री. प्रदिपकुमार धोरजे,
रा.पी कुमार हाऊस पिकेडी, इस्टेट,
स.न.२७/१/२/५, मुंबई बेंगलोर हायवे, हॉलिडै इन हॉटेल समोर–पुणे ४११०४५
४. श्रीम.निता कैलास वाडेकर,
मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
५. श्री. अनिल लक्ष्मण ठाकूर,
मु.पो. जसखार, ता. उरण जि. रायगड ४००७०७
६. श्री. सत्यवान विठ्ठल काळसेकर,
बँक ऑफ इंडिया जवळ मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
७. श्री. जनार्दन वामन पाटील,
मु.महड, पो.ता. खालापूर, जि. रायगड
८. श्री. कौस्तुभ मधूसुदन जोशी,
साबाई नगर, मु.पो.ता.खालापूर
९. श्री. जयेश भाटे राग,
फॉरचुन रॉयल ऑपार्टमेट प्लॉट न. ९६१९७, युडीसीटी कॉलेट लाईन, इस्ट वडाळा मुंबई–४०००३१
१०. श्री. राजन नेमीशरण गोयल,
गोयल ब्रदर्स आदित्य टॉवर्स ग्राउंड फ्लोअर,
झेनिथ कॉर्नरखोपोली, ता. खालापूर
११. श्री. देवकिसन जोखोटीया,
मु. तुळशी कुंज, नेहरु गार्डन शेजारी, शास्त्री नगर,
खोपोली, ता. खालापूर–४१०२०३
१२. श्री. मोतीलाल पारसमल,
कॉचवाला बिल्डींग चौथा मजला, रु.न.४४ पहिल
परसीवाडा लेन सी.पी टॅक जवळ, जानूबाई देसाई रोड
गिरगांव, मुंबई ४००००४
१३.श्री. नविनचंद्र विश्वनाथ घाटवल,
ए१/८गगणगिरी नगर सोसा लक्ष्मी नगर जवळ,
खोपोली, ता. खालापूर–४१०२०३
१४.श्री. संतोष दत्तात्रेय चौधरी,
रा. गजानन ट्रेडर्स, खालापूर फाटा
मु.पो.ता. खालापूर ४१०२०२
१५ श्री. स्वप्नील सुधाकर गायकर,
रा.धामणी, ता. खालापूर. जि. रायगड
१६. श्री. सागर लक्ष्मण झा
१७.श्री. मुरारी कुमार झा,
रा. त्रिवेणी अपार्टमेंट, पाटील आळी,
मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
१८. श्रीम, समिक्षा संतोष चौधरी,
रा. गजानन ट्रेडर्स, खालापूर फाटा,
मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
१९. संदेश रमेश पाटील,
२०. श्रीम.स्मिता संदेश पाटील
रा. कृपा अपार्टमेंट नं. १ तिसरा मजला,
प्लॉट.न. ३०१, विणानगर खोपोली,
वसंतराव देशमुख शाळेजवळ–४१०२०३
२१. अनुजा सुनिल साखरे
२२. विलास नारायण शिंद
२३. जेठमल दंदाजी गेहलोत
२४. आशालता यशवंत गायकवाड
२५. किरख प्रभाकर आपटे,
२६. गणेश शंकर पवार
२७. रमेश एकनाथ देवरुखकर,
२८. कृष्णा पांडुरंग पवार
२९. मुकेश कुमार लालसाबू चौधरी
३०. संदेश रमेश पाटील
} **सामनेवाला**

मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये कामकाज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, अर्जदार श्री. कैलास रमाकांत पंडीत व श्री. कृष्णा नारायण वाघरे रा. खालापूर, ता. खालापूर यांनी या कार्यालयास दिनांक १९/०६/२०२५ रोजी तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मौजे खालापुर, ता. खालापुर, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १०१/२/अ व ९९/७ या मिळकती तक्रारदार श्री. कैलास रमाकांत पंडीत व श्री. कृष्णा नारायण वाघरे यांचे नावे आहे. जमीन मिळकतीमध्ये जाणे येणेच्या रस्त्यात पोल टाकून तार कंपाऊड करुन रस्ता बंद केला असल्याबाबत अर्जात नमुद केले आहे. तरी शेतीकडे जाणे–येण्याचा पिढ्यान पिढ्याचा रस्ता तात्काळ मोकळा करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. प्रकरणी दिनांक १६/०३/२०२६ रोजी झालेल्या स्थळपाहणी दरम्यान सामनेवाले क्र. २ ते ३० यांच्या मिळकती असल्याचे दिसून आले आहे. तसेच सामनेवाले अ.क्र.२१ ते ३० यांचे पत्ते उपलब्ध झालेले नाहीत. त्याच प्रमाणे ग्राम महसूल अधिकारी यांनी सदरचे भोगवटादार कोठे रहात आहेत याबाबत माहिती नसल्याचे सांगितले आहे.

त्याअनुषंगाने **दिनांक २४/०७/२०२६, रोजी सकाळी ११.३० वाजता या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आलेली आहेत. त्याकामी सदर सुनावणी** करिता तुम्ही अगर तुमचे प्रतिनिधी मार्फत सर्व साक्षीपुरावे व सर्व कागदपत्रासह वरील ठिकाणी व वेळी या न्यायालयात हजर राहावे. त्याप्रमाणे तुम्ही अगर तुमचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रासह हजर न राहिल्यास तुमचे काहीही म्हणणे नाही असे धरुन प्रकरणाची सुनावणी तुमच्या गैरहजरीत होवून निर्णय देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

ठिकाण : खालापूर
दिनांक : ०९/०७/२०२६

सही/–
(विकास पवार)
कार्यकारी दंडाधिकारी तथा
महसूल नायब तहसीलदार खालापूर

PUBLIC NOTICE

Notice is given to the members of the Panvel Education Society, Panvel has declared the following election programme of election of managing committee of the Panvel Education Society.

ELECTION PROGRAMME

a) Publication of First List of Voters : 25/07/2026
b) Non inclusion and or correction of names of members on voters list. : 01/08/2026
c) Publication of corrected list of members /Voters. : 15/08/2026
d) To chart out the programme of General Election within one week of publication of amended list of voters. : 22/08/2026
e) Inviting the nominations from the candidate/s : 29/08/2026
f) List of names of applicants (Candidate) to be pasted on notice board for general information : 05/09/2026
g) Scrutiny of applications : 06/09/2026
h) Withdrawal of names : 07/09/2026
i) Date of General Election : 13/09/2026
j) Counting of votes : 13/09/2026
k) Declaration of result : 13/09/2026

Post elction work will be carried out as per the provisions of bye law as of the trust. That if any member have any suggestion, objections please contact the President of Panvel Education Society within 10 days.

Place - Panvel
Date 10/07/2026

sd/-
IQBAL QAZI
President
Panvel Education Society
Panvel-Raigad

NOTICE

1. 50% share in Flat No. 203, on 2nd floor, situated in building as known as "MELODY" of Project known as "KESAR HARMONY" Society known as "KESAR HARMONY CHS LTD", at Plot No. 11 & 12, Sector-06, Kharghar, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad, Maharashtra.
2. Shrimati Teena Shrivastava, a Member of the Kesar Harmony Co-operative Housing Society Ltd., having an address at PLOT NO. 11 & 12, SECTOR-06, KHARGHAR, NAVI MUMBAI -410206 and holding Flat No. 203 in the Melody building of the society, died on 27th April, 2021, without making any nomination.

The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/ with the secretary of the society between 11.00 A.M. to 6.30 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

For and on behalf of The Kesar Harmony Co-op. Housing Society Ltd

Place: Kharghar
Date: 07/07/2026

sd/-
Hon. Secretary
Kesar Harmony C.H.S Ltd
Kharghar

नवी मुंबई मनपाचा मालमत्ता कर संकलनाचा नवा विक्रम

पहिल्याच तिमाहीत ४३४ कोटींचा मालमत्ता कर वसूल

नवी मुंबई : प्रतिनिधी

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्याच तिमाहीत ४३४.०२ कोटी रुपयांचा मालमत्ता कर जमा करून नवी मुंबई महापालिकेने महसूल संकलनाचा नवा विक्रम नोंदविला आहे. विशेष म्हणजे यंदा करदात्यांसाठी कोणतीही सवलत, अभय योजना किंवा व्याजमाफी लागू करण्यात आली नव्हती. तरीही १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत महापालिकेच्या इतिहासातील सर्वाधिक तिमाही वसुलीची नोंद झाली असून मागील आर्थिक वर्षातील ८७६ कोटी रुपयांच्या एकूण वसुलीपैकी जवळपास ५० टक्के महसूल अवघ्या तीन महिन्यांत जमा झाला आहे.

महापालिकेच्या म्हणण्यानुसार आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत एवढ्या प्रमाणात मालमत्ता कर संकलित करणारी नवी मुंबई राज्यातील पहिली महापालिका ठरली आहे. यंदा शहरातील तीन लाख ५५ हजार ७७२ करदात्यांपैकी एक लाख ४३ हजार ३२९ करदात्यांनी मालमत्ता कर भरला. गेल्या वर्षी याच

कालावधीत ९८ हजार ४७८ करदात्यांकडून ३७२.४२ कोटी रुपये जमा झाले होते. त्यामुळे करदात्यांच्या संख्येबरोबरच महसूल संकलनातही लक्षणीय वाढ झाली आहे.

तंत्रज्ञानाचा वापर आणि डेटा विश्लेषणावर आधारित नियोजन या वसुलीत महत्त्वाचे ठरल्याचा दावा महापालिकेने केला आहे. अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त डॉ. अमोल पालवे यांच्या अधिपत्याखाली मालमत्ता कर विभागाने थकीत कर, करदात्यांच्या भरणा पद्धती, विभागनिहाय वसुली आणि महसूल संकलनातील संधींचे विश्लेषण करून रिअल-टाइम डॅशबोर्ड व व्यवस्थापन अहवालांच्या माध्यमातून वसुली प्रक्रियेवर सातत्याने देखरेख ठेवली.

त्यातून मागील वर्षी किंवा त्यापूर्वी कर न भरलेल्या १५ हजार २५० मालमत्ता धारकांकडून २३.६७ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली. तसेच मागील वर्षी दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीत कर भरणाऱ्या एक लाख २३ हजार ३२३ करदात्यांपैकी ५६ हजार ९७३ करदात्यांनी यंदा पहिल्याच तिमाहीत १६५.७४ कोटी रुपयांहून अधिक कर भरल्याने वेळेत कर भरण्याचे प्रमाण वाढल्याचे पालिकेने नमूद केले. विभागनिहाय वसुलीत घणसोलीतून सर्वाधिक ८० कोटी रुपयांचा कर जमा झाला. मालमत्तेच्या प्रकारानुसार औद्योगिक मालमत्तांचा महसुलातील वाटा ३५.७९ टक्के, निवासी ३१.९२ टक्के, व्यावसायिक २२.२६ टक्के, तर मिश्र व इतर मालमत्तांचा १०.०३ टक्के आहे.

ऑनलाइन व्यवहारांमध्ये वाढ

एकूण कर संकलनापैकी एक लाख तीन हजार ४७३ करदात्यांनी २८०.७१ कोटी रुपये (७२.२ टक्के) ऑनलाइन भरले. २७ हजार २३ करदात्यांनी ८.३६ कोटी रुपये ऑफलाइन, तर १२ हजार ८३३ करदात्यांकडून १४४.९३ कोटी रुपये बँक व्यवहारांद्वारे जमा झाले. एसएमएस आणि व्हॉट्सॲपद्वारे पाठविण्यात आलेल्या पर्सनलाइज्ड पेमेंट लिंकच्या माध्यमातून ५७ हजार ३९७ करदात्यांनी सुमारे ५८ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला. सोशल मीडियावरील माहितीपर पोस्ट, मार्गदर्शक व्हिडीओ, रील्स तसेच शहरातील प्रमुख चौक, वाहतूक सिग्नल आणि घंटागाड्यांवरील ऑडिओ जिंगल्सद्वारेही करभरणीबाबत जनजागृती करण्यात आली.

नवी मुंबईकरांनी जबाबदारीने करभरणा केल्यामुळे पालिकेच्या इतिहासात पहिल्याच तिमाहीत ४३४.०२ कोटींच्या मालमत्ता कर संकलनाचा विक्रम नोंदवला गेला. ही केवळ महसूल वृद्धी नसून नागरिकांचा महानगरपालिकेवरील विश्वास, डिजिटल सुविधांचा वाढता स्वीकार आणि शहराच्या विकासात योगदान देण्याची सामूहिक भावना यांचे प्रतीक आहे.
-सुजाता पाटील, महापौर, नवी मुंबई महानगरपालिका

मालमत्ता कर महापालिकेच्या विकासकामांचा प्रमुख आधारस्तंभ आहे. यंदा पहिल्याच तिमाहीत ४३४.०२ कोटींच्या विक्रमी कर संकलनाची नोंद होणे ही प्रशासन, कर्मचारी व नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांची फलश्रुती आहे. आगामी काळातही पारदर्शक, कार्यक्षम व नागरिकाभिमुख सेवा देत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

न्हावा शेवात ६२ एकरचे अत्याधुनिक एम्प्टी कंटेनर यार्ड

जेएनपीए-आरएसए ग्लोबलचा करार

उरण : बातमीदार

भारताचे सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) अत्याधुनिक एम्प्टी कंटेनर यार्ड विकसित करण्यासाठी आरएसए ग्लोबल यांच्यासोबत परवाना करार केला आहे. हे अत्याधुनिक एम्प्टी कंटेनर यार्ड जेएनपीएच्या लॉजिस्टिक्स परिसंस्थेत महत्त्वाची भर घालणार असून शिपिंग लाईन्स, वाहतूकदार आणि व्यापार समुदायाला रिक्त कंटेनर व्यवस्थापनासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देईल. हा प्रकल्प न्हावा शेवा येथील कंटेनर टर्मिनल्सपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर धोरणात्मक ठिकाणी विकसित करण्यात येणार आहे.

(संग्रहित छायाचित्र)

जेएनपीएद्वारे अधिकृत करण्यात आलेले हे एम्प्टी कंटेनर यार्ड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर ६२ एकर क्षेत्रात विकसित करण्यात येणार आहे. अत्याधुनिक पायाभूत सुविधा, स्वयंचलन आणि शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवून उभारण्यात येणारे हे यार्ड जलद कंटेनर हाताळणी, मालमत्तेचा अधिक कार्यक्षम वापर आणि सागरी लॉजिस्टिक्स क्षेत्रातील कार्यक्षमता व विश्वासार्हतेत लक्षणीय वाढ करेल. या सुविधेमध्ये रिक्त कंटेनरच्या संपूर्ण कार्यचक्राशी संबंधित सर्वसमावेशक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे जहाजवाहतूक कंपन्यांना कंटेनर उपकरणांचे अधिक कार्यक्षम व्यवस्थापन करता येईल. तसेच बंदरे, कंटेनर टर्मिनल्स, सीएफएस, विशेष आर्थिक क्षेत्रे, फ्री ट्रेड वेअरहाऊसिंग झोन आणि परिवहन सेवा पुरवठादार यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होईल.

या प्रकल्पात गेट ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सीसीटीव्ही देखरेख, यार्ड मॅनेजमेंट सिस्टीम तसेच देखभाल-दुरुस्तीसाठी महत्त्वाच्या प्रणालीचा समावेश असेल. यामुळे कार्यक्षमता, पारदर्शकता आणि नियंत्रण अधिक प्रभावी होणार आहे. मानकांप्रति वचनबद्धता ठेवून नवीकरणीय ऊर्जा, हरित उपक्रम, कचरा व्यवस्थापन आणि भक्कम सुरक्षा व्यवस्थादेखील येथे असणार आहे. या यार्डद्वारे जेएनपीए बंदराच्या कार्यक्षेत्रापलीकडे लॉजिस्टिक्स परिसंस्थेचा विस्तार करत आहे. व्यापक व्यापार समुदायाला अधिक कार्यक्षम, आधुनिक आणि विश्वासार्ह सुविधा देऊन भारताच्या बंदर व लॉजिस्टिक्स क्षेत्राच्या विकासासाठीची आपली वचनबद्धता जेएनपीए पुन्हा अधोरेखित करत आहे.

नवी मुंबईत अमराठी रिक्षाचालकांसाठी मोफत मराठी वर्ग

नवी मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन परिवहन विभागाच्या पुढाकारातून नवी मुंबईत अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मोफत मराठी भाषा शिकवणी वर्गाचा शुभारंभ करण्यात आला. हा उपक्रम महाराष्ट्र शासन परिवहन विभाग, नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या वतीने राबविण्यात येत असून रिक्षा चालक-मालक सेवाभावी संस्था आणि शिव वाहतूक सेवा, नवी मुंबई यांच्या सहकार्याने याची सुरुवात झाली आहे.

या उद्घाटन कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक संजय नकाते, मोटार वाहन निरीक्षक विजय पांढरमिसे, कंत दर्शन दरबार ट्रस्टचे ट्रस्टी मनोज तिवारी, सेक्रेटरी जोगेंद्र सिंग, अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूलच्या संचालिका संगीता आमले तसेच मराठी प्रशिक्षक डॉ. अमृत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाचे प्रमुख मार्गदर्शक दिलीप आमले यांच्यातर्फे

१५ ऑगस्टपर्यंत नोंदणीचे आवाहन

करण्यात आले होते.

यावेळी मान्यवरांनी मराठी भाषा शिकण्याचे महत्त्व अधोरेखित केले. रिक्षा-टॅक्सीचालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधल्यास सेवा अधिक प्रभावी, सुसंवादी आणि विश्वासार्ह होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आदर राखण्यासाठी आणि स्थानिक नागरिकांशी आत्मीयतेने संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. परिवहन विभागाच्या या मोफत मराठी भाषा शिकवणी वर्गामध्ये रिक्षा चालविताना किंवा प्रवाशांशी दैनंदिन व्यवहार करताना वापरले जाणारे शब्द, वाक्यरचना, अभिवादन, मार्गदर्शन, भाडे, पत्ता, दिशा, सुरक्षितता यांसारख्या व्यवहारातील मराठी भाषेवर विशेष भर दिला जाणार आहे.

यामुळे अमराठी चालकांना दैनंदिन कामकाज अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून प्रवाशांनाही अधिक चांगली सेवा मिळणार असल्याचे प्रशिक्षक डॉ. अमृत पाटील यांनी सांगितले. अमराठी रिक्षाचालकांची संख्या अधिक असल्याने त्यांच्यावर अन्याय होऊ नये या उद्देशाने सरकारची ही चांगली योजना आहे. त्यामुळे १५ ऑगस्टपर्यंत या योजनेचा लाभ घेऊन कमीत कमी व्यवहारापुरते मराठी येणे अनिवार्य असल्याने अमराठी रिक्षाचालकांनी या मोफत वर्गांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष दरगुडे, नवी मुंबई यांनी केले आहे.

प्रकल्पग्रस्तांना बजावलेल्या नोटिसांना स्थगिती द्या! -आमदार मंदा म्हात्रे

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या घरांना आणि इमारतींच्या बांधकामांना नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सुनावणीच्या नोटिसा बजावण्यात येत असल्याने स्थानिक भूमिपुत्रांमध्ये भीती व तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर विषयाकडे राज्य शासनाचे लक्ष वेधत बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करून संबंधित नोटिसांना तत्काळ स्थगिती देण्याची मागणी केली. तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांची गावठाणांमध्ये घरे आहेत त्यांनी महानगरपालिकेला प्रस्ताव सादर करावे, जेणेकरून शासनाला धोरण बनविण्यास मदत होईल.

आमदार मंदा म्हात्रे यांनी सभागृहात सांगितले की, ज्या स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनी देऊन नवी मुंबईच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले, त्याच भूमिपुत्रांच्या घरांना आज सुनावणीच्या नोटिसा देण्यात येत आहेत. अनेक ठिकाणी ही घरे ७०-८० वर्षांपूर्वीची असून शासनाने मालमत्तापत्रकही प्रदान केले. अशा स्थितीत या घरांना नोटिसा बजावणे अन्यायकारक असून स्थानिक प्रकल्पग्रस्तांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

दरम्यान, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही आमदार मंदा म्हात्रे यांनी यावेळी स्पष्ट केले.

मोहोपाड्यातील लॅबभोवती पाणी

मोहोपाडा : प्रतिनिधी

एमआयडीसीलगत असलेल्या आदित्य इन्व्हरमेंट लॅब परिसरात गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले. नैसर्गिक नाल्यातील कथित अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांमुळे पाण्याचा निचरा न झाल्याने लॅबच्या तिन्ही बाजूंनी पाण्याचे लोंढे उसळले आणि संपूर्ण परिसराला पुराचा वेढा पडला होता. त्यामुळे लॅबच्या कामकाजावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली. अखेर पावसाचा जोर ओसरल्याने पाणी निघून गेले.

रेकॉर्डब्रेक पावसातही कळंबोली सुरक्षित!

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल परिसरात गेल्या सहा दिवसांत तब्बल १००० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली, मात्र सर्वाधिक पूरप्रवण मानल्या जाणाऱ्या कळंबोली परिसरात यंदा कुठेही मोठ्या प्रमाणावर पाणी साचले नाही. महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी केलेल्या व्यापक नियोजन, नवीन जलनिस्सारण व्यवस्था, सखोल नालेसफाई आणि होल्डिंग पॉइंटवरील नवीन गेट्सच्या उभारणीमुळे विक्रमी पावसाचाही प्रभावी सामना करण्यात महापालिकेला यश आले आहे.

मे महिन्यापासूनच महापौर नितीन पाटील यांनी सातत्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका घेऊन कामाचा आढावा घेतला होता. तसेच संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या होत्या. जून महिन्याच्या अखेरपर्यंत पावसाने फारशी हजेरी लावली नव्हती, मात्र २८ जूनपासून पावसाला सुरुवात झाली आणि ३० जूननंतर त्याने जोरदार रूप धारण केले. जुलैच्या पहिल्याच आठवड्यात मुसळधार पाऊस पडला. गेल्या सहा दिवसांत

महापालिकेच्या नियोजनाला यश

पनवेल परिसरात १००० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली असून कळंबोलीतही विक्रमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

गेल्या वर्षी १५ मे रोजी अवघ्या काही तासांत झालेल्या सुमारे २५० मिलिमीटर पावसामुळे कळंबोलीतील अनेक भाग जलमय झाले होते. या अनुभवातून बोध घेत महापालिकेने यंदाच्या पावसाळ्यापूर्वीच आवश्यक उपाययोजनांना प्राधान्य दिले. खाडी परिसरातील होल्डिंग पॉइंटवर नवीन गेट्स बसविणे, प्रमुख नाले व गटारींची सखोल साफसफाई तसेच जलनिस्सारण व्यवस्थेची व्यापक दुरुस्ती अशी विविध विकासकामे वेळेत पूर्ण करण्यात आली. तसेच यावर्षी महापालिकेने कळंबोलीमध्ये पंचवटी सोसायटी सेक्टर १ मध्ये, पल्लवी अविदा, अग्निशमन केंद्र ते करवली चौक, केएलई महाविद्यालय ते विसर्जन तलाव सेक्टर १२, सेक्टर १० मध्ये विजय मिलन सोसायटीजवळ आणि सेक्टर ११ मध्ये गुरुद्वाराजवळ मोठ्या क्षमतेचे नवीन पावसाळी गटार बांधण्यात आले.

या पावसाळी गटारींमुळे कळंबोलीमध्ये पाणी साचले नाही. याशिवाय मुसळधार पावसाच्या काळात आरोग्य विभागाची विशेष पथके कळंबोली परिसरात तैनात ठेवण्यात आली होती. आपत्कालीन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवत आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख कैलास गावडे यांच्या नेतृत्वात महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने काम केले. त्यामुळे नागरिकांना कोणत्याही मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला नाही. ४ जुलै रोजी कळंबोलीत तब्बल २१७.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तरीही परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्याच्या घटना कुठेही घडल्याचे दिसले नाही. अतिरिक्त आयुक्त १ गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त २ महेशकुमार मेघमाळे आणि सर्व विभागांच्या उपायुक्तांनी केलेल्या पूर्वतयारीचे आणि सक्षम नियोजनाचे हे यश मानले जात आहे. दरम्यान, कळंबोलीतील नागरिकांनीदेखील या कामांबद्दल समाधान व्यक्त करत महानगरपालिकेच्या कार्याचे कौतुक केले आहे.

पनवेल महापालिकेत वर्ल्ड स्किन हेल्थ डे

आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी त्वचारोग प्रशिक्षण

पनवेल : रामप्रहर वृत्त

वर्ल्ड स्किन हेल्थ डे २०२६निमित्त पनवेल महानगरपालिका आणि अलर्ट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल महानगरपालिकेच्या प्रशिक्षण सभागृहात एकदिवसीय त्वचारोग जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. "निरोगी त्वचा निरोगी जीवन: लवकर निदान, प्रतिबंध आणि वेळेवर उपचार" ही कार्यक्रमाची प्रमुख संकल्पना होती.

या फ्रंटलाइन आरोग्य कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठी क्षमता बांधणी कार्यक्रमात फ्रंटलाइन आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि ज्येष्ठ त्वचारोग तज्ज्ञ डॉ. दीपक कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी शहर क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, निम्न वैद्यकीय अधिकारी अर्जुन ठाकूर, अलर्ट इंडियाच्या प्रोग्रॅम डायरेक्टर प्रभा महेश, सुनीथा विठ्ठल यांच्यासह विविध वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रात डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या वरिष्ठ त्वचारोग तज्ज्ञ डॉ. ऋतुजा गायकवाड आणि डॉ. अदिती वाबळे यांनी आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन केले. जनसमुदायामध्ये आढळणारे सामान्य त्वचारोग, बुरशीजन्य संसर्ग, खरूज, धोक्याची लक्षणे ओळखणे, वेळेवर संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे तसेच आरोग्य शिक्षण आणि जनजागृती याबाबत त्यांनी माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, नेरूळ येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुचित्रा सरकार यांनी वैद्यकीय अधिकारी व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. सामान्य त्वचारोगांचे अचूक निदान, पुराव्यावर आधारित उपचार पद्धती, मानक उपचार प्रोटोकॉल, गुंतागुंतीच्या त्वचारोगांचे व्यवस्थापन तसेच कुष्ठरोगाविषयी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

समारोपावेळी उपस्थितांनी आपल्या कार्यक्षेत्रात त्वचारोगांविषयी जनजागृती वाढवणे, लवकर निदानाला प्राधान्य, प्रतिबंधात्मक योजनांची अंमलबजावणी करणे आणि रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सक्रियपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी "निरोगी त्वचा निरोगी जीवन" हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याचे आवाहन करण्यात आले.

काळ, गोद नदीच्या रौद्र रूपाने माणगावला फटका; वीज आणि पाणीपुरवठा विस्कळीत

माणगाव : प्रतिनिधी

निसर्गाच्या अविरत प्रकोपाने माणगाव तालुका अक्षरशः पुराच्या महाविळख्यात सापडला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे काळ आणि गोद नदीने रौद्र रूप धारण केले असून शहरासह ग्रामीण भागात भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. रस्ते जलमय झाले, शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत पिके वाहून गेली आणि हजारो नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळित झाले.

माणगाव शहरातील खांदाड, सिध्दी नगर, भादाव, बामणोली रोड, रेल्वे स्थानक, कचेरी रोड या परिसरात तब्बल आठ दिवस पुराचे पाणी साचून राहिल्याने नागरिकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. अनेक कुटुंबांना घर सोडून सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला. संसारोपयोगी साहित्य, धान्य, फर्निचर, विद्युत उपकरणे आणि घरातील मौल्यवान वस्तूंचे मोठे नुकसान झाले. अनेकांच्या आयुष्यभराच्या कष्टावर एका रात्रीत पाणी फिरले.

पुराच्या पाण्यामुळे बामणोली, मांगवली, निळगुण, रीळे, पाचोळे, नाणोरे यांसह अनेक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला. अनेक ठिकाणी रस्ते आणि पूल पाण्याखाली गेल्याने गावांमध्ये अन्नधान्य, दूध, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विस्कळित झाला. सध्या पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याने पाण्याची पातळी हळूहळू ओसरत असली तरी जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी अजून काही दिवस लागणार आहेत.

भिरा धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने नदीच्या पाण्याच्या प्रवाहात प्रचंड वाढ झाली. तालुक्यातील सर्व धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली असून प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. या आठवड्यात तालुक्यात सुमारे १०२ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. महामार्गावरील वाहतूक सुरू असली तरी अनेक अंतर्गत रस्ते बंद राहिल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सलग ४८ तास अनेक भागांतील जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले होते.

पूराचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. भातशेतीसह विविध पिके पाण्याखाली गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने अनेक भाग अंधारात बुडाले, तर पाणीपुरवठाही अनियमित झाला. बाजारपेठ बंद राहिल्याने व्यापारी आणि छोट्या व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. मात्र या संपूर्ण संकटात माणगावकरांनी माणुसकीची परंपरा जिवंत ठेवली. पुरात अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षित स्थळी पोहोचविणे, अन्न-पाणी उपलब्ध करून देणे, वृद्ध, महिला आणि लहान मुलांना मदत करणे, रात्रभर बचावकार्य करणे अशा अनेक प्रकारे नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, पोलीस, महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा खंबीरपणे उभी राहिली. माणगावकरांनी सतर्क राहावे, एकमेकांना मदतीचा हात द्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गोमाशी-फणसवाडी मार्गावर झाड आणि माती आली वाहून

पाली : प्रतिनिधी

सुधागड तालुक्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू असून या पावसामुळे गोमाशी ते फणसवाडी मार्गावर एक मोठी दुर्घटना टळली. मुसळधार पावसामुळे रस्त्यालगत असलेले एक मोठे झाड आणि डोंगराची माती अचानक खचून थेट मुख्य रस्त्यावर आली. यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली होती.

या घटनेची माहिती मिळताच सुधागड तालुका पंचायत समितीचे उपसभापती संदेश शेवाळे यांनी तात्काळ परिस्थितीची दखल घेतली. त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने हालचाली केल्या आणि संबंधित यंत्रणेला पाचारण केले. फणसवाडी ग्रामस्थ जगदीश तुकाराम जाधव, महेंद्र नारायण शिंदे व समाधान वसंत जाधव यांच्या सहकार्याने घटनास्थळी युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले. रस्त्यावर आलेले ते भलेमोठे झाड आणि डोंगराच्या मातीचा ढिगारा बाजूला करण्यात आला.

खालापूरच्या दुर्गम मुठा ठाकूरवाडी येथे भूस्खलन; ग्रामस्थांचे स्थलांतर

चौक, खालापूर : प्रतिनिधी

खालापूर तालुक्यातील दुर्गम भागातील माडप ग्राम पंचायत हद्दीतील मुठा (ठाकूरवाडी) गावाच्या वरच्या बाजूला असणाऱ्या डोंगरावर झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे गावच्या वरच्या बाजूच्या डोंगरावरून भूस्खलन झाले, येथील नागरिकांची ईतर ठिकाणी सोय करण्यात आली आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत माडप हद्दीतील दुर्गम भागातील मुठा ठाकूरवाडीत रात्री जोरदार पावसाने भूस्खलन झाले असून सदर घटनेची माहिती मिळताच तहसीलदार अभय चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, प्रत्यक्ष पाहणी करत असतानाच त्यांच्या समोरच पुन्हा एकदा भूस्खलन झाले. आणखी त्याठिकाणी अजूनही दरड कोसळण्याची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणून गावातील सुमारे १५० कुटुंबातील अंदाजे ५०० लोकांचे स्थलांतर माडप गावातील एक्झर्बिया या वसाहतीत राहण्याचे नियोजन केले आहे.

या आपत्तीग्रस्तांना स्थलांतरितांच्या ठिकाणी राहण्याची व जेवणाची सोय केलेली असून सदर घटनास्थळी स्वतः तहसीलदार अभय चव्हाण, मंडळ अधिकारी खालापूर, ग्राम महसूल अधिकारी माडप आणि महसूल कर्मचारी जातीने हजर आहेत.मौजे मुठा (ठाकूरवाडी) येथील ग्रामस्थांना एक्झर्बिया सिटी, माडप येथे डी ४ या बंद असलेल्या इमारतीमध्ये स्थलांतरित केलेले असून एकूण ५२ कुटुंबे असून २१३व्यक्तींना स्थलांतरित केलेले आहे, या ठिकाणी त्यांचे निवासाची व्यवस्था करून अल्पोपहार देण्यात आला व पिण्याचे व वापरण्याचे योग्य पाण्याची सोय करण्यात आली, तसेच रात्रीचे भोजनाची व्यवस्था केलेली आहे .सदर सर्व कुटुंबांना चटई, बेडसिट, ब्लँकेट, बिस्किटे व फरसाण वाटप करण्यात आले असून महसूल विभाग त्यांची काळजी घेत आहे.

पाली पोलिसांचे धाडसी बचावकार्य; तिसऱ्या मजल्याच्या खिडकीवर अडकलेल्या व्यक्तीची सुखरूप सुटका

पाली : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील पाली शहरात बुधवारी मध्यरात्री एक थरारक आणि जीवघेणी घटना घडली. श्री बल्लाळेश्वर मंदिर परिसरातील विठू माऊली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या बाहेरील सज्यावर एक इसम चढून बसला होता. मात्र, खाली उतरण्याचा मार्ग नसल्याने तो त्या ठिकाणी अडकून पडला.

ही बाब स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ पाली पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच पाली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने सरकारी वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेतला. संबंधित इसम तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या सज्यावर बसलेला असल्याने त्याचा जीव धोक्यात होता. कोणत्याही क्षणी तो खाली कोसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केले.

पोलीस वाहनात आपत्कालीन परिस्थितीसाठी उपलब्ध असलेल्या दोरखंडांचा वापर करण्यात आला. तसेच स्थानिक नागरिकांची मदत घेत इमारतीच्या टेरेसवरून दोरखंड खाली सोडण्यात आला. अत्यंत सावधगिरी बाळगत आणि शिताफीने पोलिसांनी संबंधित इसमापर्यंत पोहोचून त्याला सुरक्षितरीत्या वर खेचले. काही वेळ चाललेल्या या बचाव मोहिमेनंतर त्या इसमाची सुखरूप सुटका करण्यात आली. या धाडसी आणि तत्पर कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला.

सुटका केल्यानंतर संबंधित इसमाला वैद्यकीय तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, पाली येथे नेण्यात आले. तेथे चौकशीदरम्यान त्याने आपले नाव दिलीप कोळी, रा. खैरवाडी, पोस्ट आतोणे, ता. सुधागड असे सांगितले. पुढील चौकशीत संबंधित इसम मानसिक आजाराने ग्रस्त असल्याची माहिती समोर आली आहे.

वायरमन संतोष करटूले उतरले पुराच्या पाण्यात; जिद्दीचे कौतुक

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीला आलेल्या महापुरामुळे अनेक झाडे उन्मळून पडून जात होती. ही झाडे नदीमधून वाहून जात असताना एक झाड विजेच्या खांबाला जाऊन अडकले. ते झाड काढण्यासाठी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्याने पाण्यात उतरून त्या विजेच्या खांबावर चढून झाडाचे ओंडके बाहेर काढले. वायरमन संतोष करटूले यांच्या कामगिरीने विजेच्या खांबांना धडकले असलेले झाडाचे ओंडके बाजूला करून विजेची वाहिनी कोसळण्यापासून वाचली आहे.

उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या वावे या गावाच्या बाजूने वाहणाऱ्या नदीला पूर

आला होता. यावेळी पुराच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात झाडे वाहून येत असतात. काल ७ जुलै रोजी दुपारी एक मोठे ओंडके पूराच्या पाण्यासोबत वाहत असताना वावे गावाजवळ वाहून जात असताना विजेच्या खांबाला जाऊन धडकला. त्याचा परिणाम त्या भागातून जाणाऱ्या विजेची वाहिनीचा मार्ग अडचणीत आला. झाडाचे ओंडके इतके प्रचंड आकाराचे होते की त्यामुळे विजेचा खांब कधीही कोसळून मोठा अपघात होऊ शकणार होता. त्यामुळे आजुबाजूच्या गावातील वीज पुरवठा बंद होणार होता. ही बाब लक्षात घेऊन महावितरणचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे आणि सहायक अभियंता कर्जत दहिवली अनु पिंगळे हे वावे येथे पोहचले. त्यावेळी उल्हास नदीमधून वाहत आलेला झाडाचा ओंडका नदीमधून पलीकडे वीज वाहिनी नेणारा विजेचा खांब उखडून टाकू शकतो. अशी स्थिती निर्माण झाली.

त्या ठिकाणी उपस्थित असलेले महावितरण चे वायरमन संतोष करटूले यांनी आपण विजेच्या खांबावर चढून ते झाडाचे ओंडके बाजूला करतो. अशी तयारी दाखवली. पाण्याचा मोठा प्रवाह त्या विजेच्या खांबाच्या बाजूने जात असताना पाण्यात उतरून वायरमन संतोष करटूले हे विजेच्या खांबावर चढले. उल्हास नदी दुथडी भरून वाहत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून संतोष करटूले यांच्या पाठीवर दोरखंड बांधण्यात आला. शेवटी खांबावर पोहचलेल्या स्थानिक डोंगरपाडा गावातील तरुण संतोष करतुले यांनी जबरदस्त ताकद लावत तो लाकडाचा ओंडका तेथून बाजूला नदीमध्ये टाकण्याचे काम केले.

एका सेल्फीसाठी मृत्यूशी झुंज; सोलो ट्रेकरच्या बेफिकीर धाडसाने यंत्रणा लागली कामाला

खोपोली, खालापूर : प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. डोंगरदऱ्या धुक्याने व्यापल्या आहेत, नद्या दुथडी भरून वाहत आहेत आणि धबधबे रौद्ररूप धारण करत आहेत. प्रशासन, हवामान विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सातत्याने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका, असे आवाहन करत आहेत. मात्र सोशल मीडियासाठी फोटो, व्हिडिओ आणि थरार अनुभवण्याच्या हव्यासापोटी काही हौशी पर्यटक अजूनही जीवाशी खेळ करत असल्याचे चित्र आहे.

अशाच एका बेफिकीर युवकामुळे खोपोलीतील प्रसिद्ध केपी वॉटर फॉल परिसरात बुधवारी संध्याकाळी थरारक बचाव मोहीम राबवावी लागली. मोहम्मद जुहेर शेख या १८ वर्षीय युवकाच्या हट्टामुळे पोलीस, आपत्कालीन यंत्रणा आणि हेल्प फौंडेशनच्या सदस्यांना मुसळधार पावसात स्वतःचा जीव धोक्यात घालून डोंगरमाथ्यावर चढावे लागले.

मुंबईतील कुर्ला येथे राहणारा हा युवक ८ जुलै रोजी सकाळी सुमारे अकरा वाजता घरच्यांना कोणतीही माहिती न देता एकटाच लोकल रेल्वेने खोपोलीत दाखल झाला. मोबाईलवर मिळालेल्या लोकेशनच्या आधारे तो प्रथम झेनिथ वॉटर फॉल परिसरात पोहोचला. धबधब्याचे रौद्र सौंदर्य पाहून तो भारावून गेला. मात्र तेवढ्यावर समाधान न मानता त्याने आणखी धोकादायक असलेल्या केपी वॉटर फॉलच्या उगमाकडे जाण्याचा निर्णय घेतला.

समोर होती निसरडी चढण, उभा कातळ, दाट झाडी आणि डोंगरमाथ्यावरून कोसळणाऱ्या पाण्याचा प्रचंड प्रवाह त्यात पावसाची सोबत. सामान्य माणूस अशा परिस्थितीत मागे फिरला असता, पण तो तब्बल तीन तास संघर्ष करत धबधब्याजवळ पोहोचला. तेथे त्याने सेल्फी काढली, छायाचित्रण केले, सोबत आणलेले खाद्यपदार्थ संपवले आणि समाधानाने परतीचा मार्ग धरला.

सायंकाळी साडेचारच्या सुमारास परतताना त्याचा पाय घसरला आणि तो जोरात कातळावर आदळला. डाव्या हाताला जखम झाली, अंगाला जबर मुका मार बसला आणि चालणे अवघड झाले. काही क्षणांपूर्वी धाडसाचे प्रतीक वाटणारा डोंगर आता त्याला मृत्यूच्या दरीसारखा भासू लागला.

आजूबाजूला कोणी नव्हते. पावसाचा आवाज एवढा प्रचंड होता की मदतीसाठी आरडाओरडा करूनही उपयोग नव्हता.घरच्यांना काही न सांगता आल्याची खंत आणि जीव वाचेल की नाही, याची भीती त्याला सतावू लागली. त्याच वेळी त्याने मोबाईलवर मदतीचा मार्ग शोधला आणि ११२ या आपत्कालीन हेल्पलाइनवर संपर्क साधला.त्याच्या हेल्पलाइन वरील एका फोन कॉलने संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली. खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, पोलीस हवालदार धनाजी रूपनवर आणि बीट मार्शल यांनी तातडीने परिस्थितीचा आढावा घेत हेल्प फाउंडेशनशी संपर्क साधला.

सायंकाळी पाचच्या सुमारास हेल्प फाउंडेशनचे प्रशिक्षित बचाव पथक आवश्यक उपकरणे, दोरखंड आणि सुरक्षा साहित्य घेऊन त्या युवकाच्या दिशेने रवाना झाले. मात्र पुढील काही तास हे त्या युवकासाठी आणि बचाव पथकासाठी परीक्षा घेणारे ठरले. भरधाव वेगाने कोसळणारे धबधबे, कमरेपर्यंत वाहणारे पाण्याचे प्रवाह, चिखलाने निसरडे झालेले कातळ आणि सतत खंडित होणारे मोबाईल नेटवर्क यामुळे युवकाचे अचूक लोकेशन शोधणे कठीण बनले होते.

प्रत्येक मिनिटागणिक अंधार वाढत होता आणि बचाव मोहिमेची जोखीमही वाढत होती. दुसरीकडे, जखमी युवकाचा धीर सुटत चालला होता. प्रत्येक फोन कॉलमध्ये त्याच्या आवाजातील भीती वाढलेली जाणवत होती. "मला वाचवा... लवकर या..." अशी त्याची विनवणी ऐकून बचाव पथक आणखी वेगाने पुढे सरकत होते.

अखेर अनेक अडथळे पार करत हेल्प फाउंडेशनचे सदस्य त्याने सांगितलेल्या खुणांपर्यंत पोहोचले. दूरवरून दिसलेले ते चेहरे त्या युवकासाठी देवदूतांपेक्षा कमी नव्हते. समोर मदत पोहोचल्याचे पाहताच त्याच्या डोळ्यांत अश्रू तरळले. टीमने त्याला प्रथम पाणी आणि खाद्यपदार्थ दिले. जखमेची पाहणी केली आणि प्रथमोपचार करत मानसिक आधार दिला.

त्यानंतर सुरू झाला परतीचा सर्वात धोकादायक टप्पा. प्रत्येक पाऊल जपून टाकत, नीसरड्या वाटांवर एकमेकांना आधार देत आणि धबधब्यांच्या पाण्याशी झुंज देत बचाव पथकाने युवकाला सुरक्षित खाली आणले. तोवर संपूर्ण परिसरात अंधार पसरू लागला असतानाच ही मोहीम यशस्वी ठरली आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला.

खोपोली पोलीस स्टेशनमध्ये त्या युवकाला आणल्यानंतर पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी त्याची समजूत काढली. त्यांनी नातेवाईकांशी संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली आणि भविष्यात अशा प्रकारचे जीवघेणे धाडस टाळण्याचा सल्ला दिला.

या धाडसी मोहिमेत हेल्प फाउंडेशनचे सौरभ घरत यांच्या मार्गदर्शनाखाली महेश भोसले, अमोल कदम, निलेश कुदळे, गौरव शिंदे, भक्ती साठेलकर, रघुवीर खरे, संकेत पाटील, साहिल घरत आणि अथर्व रासम यांनी सहभाग घेतला.

फिफा वर्ल्डकपमध्ये युरोपचे वर्चस्व कायम

यजमान देशांचे आव्हान संपुष्टात

मियामी गार्डन्स : वृत्तसंस्था

फिफा विश्वचषक २०२६ आता अंतिम टप्प्याकडे झुकला असून स्पर्धेतील ४८ संघांमधून आता केवळ आठ संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहचले आहेत. या आठ संघांमध्ये पुन्हा एकदा युरोपचे सहा संघ वर्चस्व गाजवत आहेत, तर दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेकडून प्रत्येकी एक संघ उरला आहे. गेल्या जवळजवळ शतकाचा इतिहास पाहता विश्वचषक विजेतेपदाचा पेच पुन्हा एकदा युरोप आणि दक्षिण अमेरिका यांच्यातच अडकल्याचे स्पष्ट होत आहे.

१९३०पासून आतापर्यंत झालेल्या २२ विश्वचषक स्पर्धांमध्ये १२ वेळा युरोप, तर १० वेळा दक्षिण अमेरिकेने विजेतेपद पटकावले आहे. उर्वरित जगाला अद्याप हे अजिंक्यपद मिळवता आलेले नाही. यंदाची उपांत्यपूर्व फेरीही या ऐतिहासिक आकडेवारीला अनुसरूनच आहे.

यंदाच्या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे उत्तर अमेरिका (अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा) हे तीन देश सह-यजमान होते. त्यांच्याकडून घरच्या मैदानात मोठ्या कामगिरीची अपेक्षा होती. गट फेरी आणि ३२ संघांच्या फेरीत या तिन्ही संघांनी ९-२-१ अशी शानदार कामगिरी करत २० गोल नोंदवले होते, मात्र १६ संघांच्या फेरीत या तिन्ही यजमान संघांना हार पत्करावी लागली. विशेषतः अमेरिकेचा बेल्जियमविरुद्ध ४-१ असा झालेला पराभव उत्तर अमेरिकन फुटबॉलच्या मर्यादा उघड करणारा ठरला.

युरोपच्या वर्चस्वाचे एक मोठे कारण म्हणजे नॉर्वेसारख्या नव्या आघाड्यांचे यश. स्टार खेळाडू अर्लिंग हालंड याने ब्राझीलसारख्या बलाढ्य संघाला हरवून नॉर्वेला पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरीत नेले आहे.

क्वार्टर फायनलमध्ये चुरस

उपांत्यपूर्व फेरीतील ही स्थिती पाहता यंदाही विजेता युरोप किंवा दक्षिण अमेरिकेतीलच असेल, असे चित्र दिसत आहे. मोरोक्को (आफ्रिका) हा संघ आता इतिहास बदलण्यासाठी धडपडत असला, तरी उर्वरित सात संघ युरोप आणि दक्षिण अमेरिकेचे प्रतिनिधित्व करत आहेत. आता या आठ संघातून कोण विश्वविजेतेपदाच्या ट्रॉफिक जॅममधून बाहेर पडून अंतिम टप्प्यात प्रवेश करतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

छत्रपती संभाजीनगरमध्ये राष्ट्रीय मास्टर्स पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

१८ ते २३ जुलैदरम्यान रंगणार थरार

पनवेल : रामप्रहर वृत्त

छत्रपती संभाजीनगर येथील गारखेडा स्टेडियममध्ये १८ ते २३ जुलै या कालावधीत राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन संभाजीनगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने केले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे, माजी महापौर त्रिंबक तुपे, नगरसेवक सिद्धांत शिरसाट आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

क्लासिक आणि इक्विपड अशा दोन प्रकारच्या सिद्धांत शिरसाट स्पर्धेत संपूर्ण देशातून अनेक नामवंत मास्टर्स म्हणजे ४०, ५०, ६० आणि ७० वर्षावरील अंदाजे ८०० पुरुष व महिला खेळाडू आणि १०० पंच व प्रशिक्षक सहभाग घेणार आहेत. यामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय पदक विजेते आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये या स्पर्धेची ही दुसरी वेळ आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष सतीश कुमार, सचिव अर्जुन पुरस्कार सन्मानित पी.जे. जोसेफ आणि इतर पदाधिकारी हजर राहणार आहेत तसेच महाराष्ट्राचे राष्ट्रीय पंच शिव छत्रपती पुरस्कार सन्मानित संजय माधव, अनंत चाळके, सूर्यकांत गद्रे, सतीश पाताडे, पुण्याचे गिरीश गिंडी, राजहंस मेहंदळे, किरण त्यागी, आंतरराष्ट्रीय पंच विजय पाटील, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पंच रक्षा महाराव आदी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धा राज्य संघटनेचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार सन्मानित संजीवन भास्करन, सचिव आंतरराष्ट्रीय पंच व शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित संजय सरदेसाई यांच्यासह छत्रपती संभाजीनगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव सुरेश बाहुले, सहसचिव जस्वीरसिंग भाटिया यांचे सहकार्याने होणार आहे.

मोरोक्कोविरुद्धच्या लढतीपूर्वी फ्रान्सला मोठा धक्का



फॉक्सबरो : वृत्तसंस्था

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत मोरोक्कोविरुद्ध मैदानात उतरण्यापूर्वी फ्रान्सला मोठा धक्का बसला आहे. पॅराग्वेविरुद्धच्या राउंड ऑफ १६ सामन्यात स्टार खेळाडू मायकल ओलिसेला दाखवलेले यलो कार्ड रद्द करण्याची फ्रान्सची याचिका फिफाने फेटाळून लावली आहे. फ्रान्सचे प्रशिक्षक डिडिएर डेशॅम्प्स यांनी स्वतः या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

फिलाडेल्फिया येथे पार पडलेल्या पॅराग्वेविरुद्धच्या सामन्यात शेवटच्या मिनिटांमध्ये मायकल ओलिसे आणि माटियास गॅलार्झा यांच्यात वाद झाला होता. या वादानंतर रेफरींनी ओलिसेला पिवळे कार्ड दाखवले होते. या घटनेच्या रिप्लेमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये फारसा संपर्क झाला नसल्याचे स्पष्टपणे दिसत होते. ओलिसेने केवळ आपल्या तोंडासमोर बोट ठेवले असताना पॅराग्वेचा खेळाडू गॅलार्झा चेहऱ्यावर फटका बसल्याचे नाटक करत जमिनीवर कोसळला होता.

या अन्यायी निर्णयाविरुद्ध फ्रान्स फुटबॉल महासंघाने फिफाकडे दाद मागितली होती, मात्र 'फिफा'ने ही विनंती फेटाळत पिवळे कार्ड कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे फ्रान्सच्या टीम मॅनेजमेंटची चिंता वाढली आहे. मायकल ओलिसे आता 'यलो कार्ड ट्रॅप'मध्ये अडकला आहे. जर मोरोक्कोविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात त्याला पुन्हा पिवळे कार्ड मिळाले, तर तो संभाव्य सामन्यातून निलंबित होईल.

मायकल ओलिसेवरील यलो कार्ड कायम

शुआमेनी दुखापतीतून सावरतोय!

फ्रान्सच्या गोटातून एक सकारात्मक बातमी म्हणजे मिडफिल्डर ऑरेलियन शुआमेनी आता दुखापतीतून सावरत आहे. मांडीच्या दुखापतीमुळे त्याला पॅराग्वेविरुद्धच्या सामन्याला मुकावे लागले होते. प्रशिक्षक डेशॅम्प्स यांनी सांगितले की, ऑरेलियनची प्रकृती सुधारत आहे. तो आज सरावात सहभागी होण्याची शक्यता आहे. बाकी सर्व खेळाडू मोरोक्कोविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त आणि उपलब्ध आहेत.

इंग्लंडची क्रिकेटपटू टॅमी ब्यूमोंटची निवृत्ती

लंडन : इंग्लंड महिला क्रिकेट संघाची स्टार सलामी बॅटर टॅमी ब्यूमोंट हिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

भारताविरुद्ध लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानात ती कारकिर्दीतील अखेरचा सामना खेळण्यासाठी ती मैदानात उतरेल. ब्यूमोंट ही महिला क्रिकेट जगतातील सर्वोत्तम बॅटरपैकी एक आहे. जवळपास १७ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत तिने अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.

टॅमी ब्यूमोंट हिने २००९मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आतापर्यंत तिने इंग्लंडच्या संघाकडून २६० सामने खेळले आहेत. भारत-इंग्लंड यांच्यात लॉर्ड्सच्या मैदानात एकमेव कसोटी सामना खेळवण्यात येणार आहे. १० जुलैपासून रंगणारा हा सामना टॅमीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरेल.

राष्ट्रीय शालेय स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका!

विजेतेपदाची हॅट्ट्रिक

पुणे : प्रतिनिधी

भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाच्या हॅट्ट्रिकचा पराक्रम महाराष्ट्राने केला आहे. विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

दिल्लीत नुकत्याच झालेल्या भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महाराष्ट्राला विजेतेपदाच्या करंडकाने गौरविण्यात आले. शालेय खेळ महासंघाचे अध्यक्ष दीपक कुमार यांच्या हस्ते उपसंचालक संजय सबनीस, उपसंचालक उदय जोशी, सहाय्यक संचालक चंद्रशेखर साखरे व क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांनी राज्याचा वतीने विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. यावेळी देशभरातील राज्य प्रतिनिधी उपस्थित होते.

याबरोबरच महाराष्ट्र राज्याने शालेय आशियाई व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या निवड चाचणीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दलही राज्याचा गौरव करण्यात आला

गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ६९व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपदाचा पराक्रम केला आहे. १८७ सुवर्ण, १६९ रौप्य, १९० कांस्य अशी एकूण ५४६ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले. पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक सेवा संचालनालय आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी यांनी सूपूर्त केला. यावेळी उपसंचालक संजय सबनीस, क्रीडा अधिकारी अरुण पाटील उपस्थित होते.

हरियाणा, दिल्ली या बलाढ्य संघांना मागे टाकून महाराष्ट्राने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपदाला गवसणी घातली. हरियाणाने १२१ सुवर्ण, ९६ रौप्य, ९६ कांस्यसह एकूण ३१३ पदके जिंकून दुसरे स्थान प्राप्त केले. दिल्लीचा संघ १०७ सुवर्ण, ११६ रौप्य, ९४ कांस्यसह एकूण ३१७ पदके जिंकून तिसऱ्या स्थानावर राहिला.

विजेत्यांना रोख बक्षीस

शालेय गट, १८ वर्षांखालील युवा गट व वरिष्ठ गटात विजेतेपदाची हॅट्ट्रिक महाराष्ट्राने केली आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया युवा स्पर्धांप्रमाणेच राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्यांना क्रीडा व युवक सेवा संचलनालकडून रोख बक्षिस देण्याची परंपरा आहे. सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक विजेत्यांना अनुक्रमे ११२५० रु., ८९५० रु., ६७५० रु. तसेच सहभागी खेळाडूंनाही ३७५० रुपयांचे रोख शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत आहे.

रेफरी फ्रान्स्वा लेटेक्सियर वादाच्या भोवऱ्यात

इजिप्तची 'फिफा'कडे अधिकृत तक्रार

दोहा : वृत्तसंस्था

फिफा विश्वचषकातील अर्जेंटिना विरुद्ध इजिप्त सामन्यात पंचांच्या काही वादग्रस्त निर्णयांनी मोठा गदारोळ निर्माण केला आहे. या सामन्याचे मुख्य रेफरी फ्रान्स्वा लेटेक्सियर यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत इजिप्त फुटबॉल असोसिएशनने (इएफएफ) 'फिफा'कडे औपचारिक निषेध नोंदवला आहे.

सामन्यात इजिप्तने २-० अशी भक्कम आघाडी घेतली होती, मात्र सामन्याच्या ७९व्या मिनिटापासून अर्जेंटिनाने लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली जोरदार पुनरागमन केले. मेस्सीने एक गोल आणि एका असिस्टसह सामन्याचे पारडे फिरवले, तर एन्झो फर्नांडिसने अतिरिक्त वेळेत गोल करत अर्जेंटिनाला विजय मिळवून दिला.



इजिप्तचा संघ मात्र या पराभवापेक्षा पंचांच्या काही निर्णयांवर अधिक संतप्त आहे. यात प्रामुख्याने व्हीएआर पुनरावलोकनानंतर रद्द झालेला इजिप्तचा गोल आणि अर्जेंटिनाच्या निर्णायक गोलच्या आधी न तपासलेले पेनल्टी अपील यांचा समावेश आहे. या निर्णयांमुळे सामन्याचा निकाल प्रभावित झाल्याचा दावा इजिप्तकडून करण्यात आला आहे.

इजिप्त फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष हानी अबो रिदा यांनी यासंदर्भात फिफाकडे लेखी तक्रार केली आहे. पंचांनी केलेल्या कथित चुका पाहता रेफरी फ्रान्स्वा लेटेक्सियर आणि त्यांच्या पथकाला उर्वरित स्पर्धेतून काढून टाकण्याची मागणी महासंघाने केली आहे.

वृत्तानुसार फिफा आता या संपूर्ण प्रकरणाचे तांत्रिक पुनरावलोकन करणार आहे. यामध्ये पंचांचा अहवाल, व्हिडीओ फुटेज आणि तांत्रिक कामगिरी तपासली जाणार आहे, मात्र सूत्रांच्या माहितीनुसार ही तक्रार यशस्वी होण्याची शक्यता कमी आहे. नियमांनुसार कोणताही देश पंचांच्या नियुक्तीवर नकाराधिकार (वेटो) वापरू शकत नाही, कारण हे अधिकार पूर्णपणे फिफा पंच समितीच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे आता फिफा या प्रकरणी काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मेजर लीग क्रिकेटमध्ये युवा फलंदाजाचे वादळी शतक

न्यूयॉर्क : अमेरिकेतील मेजर लीग क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेचा युवा फलंदाज लुहान-ड्रे-प्रेटोरियस याने एमआय न्यूयॉर्कविरुद्ध झालेल्या लढतीत तुफानी शतकी खेळी केली.

एमआय न्यूयॉर्कने दिलेल्या १४४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लुहान ड्रे प्रेटोरियस याने प्रतिस्पर्धी गोलंदाजांची धुलाई करत सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स संघाला विजय मिळवून दिला.

बोल्टसह दिग्गजांची धुलाई

या लढतीत लुहान ड्रे प्रेटोरियस याने ५२ चेंडूत नाबाद १०२ धावांची खेळी केली. डावाच्या अखेरीस सॅन फ्रान्सिस्को संघाला विजयासाठी एका धावेची, तर प्रेटोरियसला शतक पूर्ण करण्यासाठी दोन धावांची आवश्यकता होती. तेव्हा प्रेटोरियसने चौकार ठोकत आपले शतक पूर्ण केले तसेच संघाच्या विजयावरही शिक्कामोर्तब केले.

आयसीसी टी-२० क्रमवारीत ईशान-अभिषेकचा दबदबा कायम

श्रेयस अय्यरची मुसंडी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) नव्याने जाहीर केलेल्या पुरुष टी-२० क्रिकेट क्रमवारीमध्ये इंग्लंडच्या खेळाडूंना मोठा फायदा झाला आहे. विशेष म्हणजे आयर्लंडपाठोपाठ इंग्लंड दौऱ्यावर संघर्ष करणाऱ्या टीम इंडियातील खेळाडूंचा दबदबाही कायम राहिला असून कर्णधार श्रेयस अय्यरने क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे.

इंग्लंडचा युवा फलंदाज जेकब बेथेल फलंदाजांच्या क्रमवारीत तब्बल सात स्थानांच्या सुधारणेसह आठव्या क्रमांकावर पोहचला आहे. याशिवाय इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करन फलंदाजी आणि गोलंदाजी क्रमवारीत १२ स्थानांनी झेपावत अनुक्रमे १०८ आणि ७१व्या स्थानावर पोहचला आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत तो सहा स्थानांनी वर येत संयुक्त १३व्या स्थानावर आहे.

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर याने फलंदाजांच्या क्रमवारीत तब्बल ४२५ स्थानांची झेप घेत ९३वे स्थान गाठले आहे. कर्णधारपदाची सुरुवात पराभवाने झाली असली, तरी अय्यरने पहिल्या सामन्यात ६८, तर दुसऱ्या सामन्यात ३७ धावांची खेळी करत आपली छाप पाडली.

भारताचा यष्टीरक्षक फलंदाज ईशान किशन टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम आहे. त्याने दुसऱ्या सामन्यात ४९ धावा केल्या. अभिषेक शर्मा दुसऱ्या स्थानावर कायम असून तिसऱ्या सामन्यात तोही अपयशी ठरला होता.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com